दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १८९ वा शनिवार दि.११ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# तिजोरी भरण्यासाठी राज्यात कर वाढणार? महसूलवाढीसाठी सचिवांची समिती गठित

मुंबई : प्रतिनिधी-विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसारख्या लोकप्रिय घोषणा करून सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने आता निवडणुकीतील आश्वासनांच्या पूर्तीसाठी महसूल वाढीवर लक्ष केंद्रित केले आहे. मद्यनिर्मिती अर्थात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या माध्यमातून सरकारला मिळणा-या महसुलात वाढ होण्यासाठी सरकारने गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. ही समिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या माध्यमातून सरकारला जादा महसूल मिळवून देण्याबाबत सरकारला उपाययोजना सुचविणार आहे.

राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी नवे मार्ग शोधण्यासाठी राज्य सरकारने ५ सदस्यांची समिती स्थापन केली आहे. या समितीकडून महसूल मिळवण्याचा नवीन मार्ग म्हणून मद्य उत्पादन आणि विक्रीच्या शक्यतेचा अभ्यास केला जाणार आहे. गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीत वित्त आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, राज्य जीएसटी आयुक्त आणि उत्पादन शुल्क आयुक्त या समितीचे सदस्य असतील.

या सर्वांना एकत्रितपणे मद्य उत्पादन, मद्य विक्री परवाने, उत्पादन शुल्क आणि इतर राज्यांनी अवलंबलेल्या महसूल वाढविण्याच्या पद्धती आणि धोरणांचा अभ्यास करण्याचे काम सोपवले जाणार आहे. या समितीकडून राज्याचे महसुली उत्पन्न वाढविण्यासाठीच्या उपायांवर शिफारसी अपेक्षित आहेत.

## आश्वासनपूर्तीसाठी सरकारची धडपड

विधानसभा निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्षांनी मोठमोठ्या घोषणा केल्या होत्या. महायुतीनेदेखील निवडणुकीच्या तोंडावर भरमसाठ आश्वासने दिली होती. लाडकी बहीण आणि अशा इतरही योजना जाहीर केल्या होत्या. आता राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर ती आश्वासने पूर्ण करावी लागणार आहेत. त्यामुळे राज्य सरकारची धडपड सुरू आहे.

# लातूर शहरात नागरीकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध

लातूर/प्रतिनिधी :- लातूर शहरामध्ये वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे व शहरामधील मुख्य बाजारपेठेमध्ये पार्कींगची व्यवस्थां नसल्यामुळे रस्त्यावर ट्राफीक वाढत आहे. त्यामुळे लातूर शहरातील नागरीकांना महानगरपालिका मालकीच्या जागेवर पार्कींगची व्यवस्था उपलब्ध करुन देणेचा निर्णय मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी घेतला आहे. त्यानुसार मनपा मालकीच्या जागा अण्णाभाऊ साठे चौक येथील मोकळी जागा, गांधी मार्केट सा.क्रं. ११२ येथील वाहनतळ जागा, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उडडाणपुला खालील मोकळी जागा, स्व.विलासराव देशमुख मार्गावरील जागेवर वाहनतळ या ठिकाणी पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या व सदरचे काम श्री. स्वाप्नील दिलीप कांबळे यांना देण्यात आले आहे. तरी शहरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की आपले दुचाकी, चारचाकी वाहन वरील पार्कींगच्या ठिकाणी सशुल्क ठेवून महानगरपालिकेस सहकार्य करावे. तरी लातूर शहरातील सर्व नागरीकांना याव्दारे सूचित करण्यात येते की उपरोक्त ठिकाणी आपली वाहने पार्कींग करावीत.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार ट्युशन एरियातील बंद असलेली अष्टविनायक पोलीस चौकी पुन्हा सुरू

लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. ९ जानेवारी रोजी सकाळी लातूर शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्याशी फोनवरून संवाद साधून ट्युशन एरियातील बंद असलेली अष्टविनायक मंदिराशेजारील पोलीस चौकी पुन्हा सुरू करावी, अत्यंत रहदारीचा परिसर असलेल्या ट्युशन एरियात हाणामारी टवाळखोरांचा नाहक त्रास विद्यार्थ्यांना होऊ नये यासाठी चार्लीची ग्रस्त वाढवावी, दामिनी पथक रात्री अपरात्री कायम ठेवावे, ट्युशन एरिया परिसरात ड्युटीवर असलेल्या पोलीस



कर्मचाऱ्यांचा मोबाईल नंबर सर्व ट्युशन चालकांना देण्यात यावा, अष्टविनायक पोलीस चौकीला पुरुष व महिला कर्मचारी कायमस्वरूपी नेमावेत, अशी त्यांनी सूचना केली. या संदर्भाने शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांची काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी भेट घेवून ट्युशन एरियातील अनेक प्रश्नासंदर्भात चर्चा केली, सर्व सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल अशी ग्वाही पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांनी दिली. यावेळी माजी महापौर स्मिता खानापुरे, माजी नगरसेवक राजकुमार जाधव, राजु मोटेगावकर, धर्मराज जांभळे, महेश नागलगावे, सुवर्णा खानापुरे, शितल जायगावकर आदी उपस्थित होते.

# आ.रमेशआप्पा कराड यांच्या जनसेवेचा वारकरी या दिनदर्शिकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

लातूर/ प्रतिनिधी :- भारतीय जनता पार्टीचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार मा. रमेशआप्पा कराड यांचे आकर्षक छायाचित्र असलेल्या जनसेवेचा वारकरी २०२५ या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन शुक्रवारी भाजपाच्या संवाद कार्यालयात हभप रामकृष्ण महाराज शास्त्री आणि ह भ प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

आ. रमेशआप्पा कराड जनसेवेचा वारकरी २०२५ या वर्षाची दिनदर्शिका अभिमान वायबसे यांनी तयार केली असून या दिनदर्शिकेचे प्रकाशन घरणी येथील आनंदवन आश्रमाचे हभप रामकृष्ण महाराज शास्त्री आणि ह भ प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले असून याप्रसंगी जेष्ठ पत्रकार अरुण समुद्रे, संत गोपाळ बुवा शुगर मिल्स साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, मराठवाडा नेताचे संपादक रामेश्वर बद्दर, सामाजिक







कार्यकर्ते भारत बरूरे, भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड, रेणापूर तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

त्यागमूर्ती प्रयागआक्का कराड यांचे मार्गदर्शन, आशीर्वाद आणि कृपाछत्र कराड परिवाराला लाभले त्यामुळेच या परिवारातील अनेक जण जनसेवेसाठी सतत कार्यरत आहेत. अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य करणारे कराड परिवार असल्याचे सांगून हभप रामकृष्ण महाराज शास्त्री यांनी असंख्य वारकरी पंढरीच्या पांडुरंगा साठी आहेत तर रमेश आप्पा कराड हे जनसामान्यांची सेवा करणारे वारकरी आहे. देव, धर्म, देश आणि संस्कृती जतन करण्याचे कार्य त्यांच्या हातून अविरतपणे व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली तर ह भ प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर यांनी जनसेवेचे वृत्त हाती घेतलेल्या रमेश आप्पा कराड यांनी मतदारसंघाचेच नव्हे तर राज्याचे नेतृत्व करावे त्यांना उज्वल भविष्य प्राप्त व्हावे असा आशीर्वाद दिला. पत्रकार अरुण समुद्रे आणि भाजपाचे राजेश कराड यांनी आपल्या भावना व्यक्त करून वायबसे यांच्या दिनदर्शिकाचे कौतुक केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

याप्रसंगी भाजपाचे पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, ज्येष्ठ कार्यकर्ते विजय क्षिरसागर, अमोल पाटील, धनराज बरुरे, संगायो समितीचे लातूर शहर अध्यक्ष शिवसिंह सिसोदिया, रेणापूरचे अध्यक्ष वसंत करमोडे, हभप शंकर महाराज लातूरकर, विवेक बाजपाई, विजय काळे, प्रताप पाटील, ज्ञानोबा भिसे, सुकेश भंडारे, शरद दरेकर, राजकारण साठे, गोपाळ शेंडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती प्रारंभी अभिमान वायबसे आणि ऋषी वायबसे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

# रॅबी फोर इंजेक्शनचा तुटवडा, कुत्रा चावल्यास लस घेण्यासाठी रुग्णांची तेलंगणा राज्यात धाव

किनवट/शेख शौकत :-कुत्रा चावल्यानंतर रुग्णांना देण्यात येणारे रॅबी फोर इंजेक्शनचा (अँटी रेबी लस) तुटवडा असल्याने रुग्णांना खासगी औषध दुकान गाठण्याची वेळ आली आहे. तेथेही महागडी लस मिळत नसल्याने कुत्र्याने चावा घेतलेले रुग्ण भयभीत होत आहेत. त्यामुळे तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथे रुग्णांना जावे लागत आहे.



सध्या कुत्र्यांकडून नागरिकांना चावा घेण्याचे प्रमाण वाढले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात मागील काही दिवसांपासून कुत्र्यांनी चावा घेतलेले रुग्ण येत आहेत. मात्र, सरकारी दवाखान्यात इंजेक्शनचा तुटवडा असल्याने रुग्णांच्या नातेवाइकांना आदिलाबाद येथे जाऊन लस घेण्याची वेळ येत आहे. त्यामुळे वेळ, पैसा खर्च होतो आहे. तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना रॅबी फोर या इंजेक्शनचा पुरवठा केला जात नाही. त्यातच उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे एक- दोन दिवस आड करून इंजेक्शनचा पुरवठा होत आहे. आरोग्य अधिकारी गायकवाड यांनी, सध्या रॅबी फोर इंजेक्शनचा पुरवठा कमी होत असल्याचे सांगितले. गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात इंजेक्शनचा पुरवठा तोही नियमित कमी होते.किनवट तालुक्याच्या अनेक भागातून, तसेच माहूर तालुक्यातून रुग्ण दाखल होत असल्याने दहावरून हा आकडा चार ते पाचपट करावा, अशी मागणी रुग्ण कल्याण समितीचे सदस्यांनी केली आहे.

# युवकांनी धम्मचळवळीमध्ये सक्रिय योगदान देणे गरजेचे -प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड

## यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगांव येथे आयोजित धम्मपरिषदेमध्ये तिसरे सत्र उत्साहात संपन्न

लातूर / प्रतिनिधी :- बौध्दधम्म हा विज्ञानिष्ठ, बुद्धिवादी, मानवतावादी आहे. तो दैववादावर नव्हे तर स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवतो. त्यामुळे आपणही आपल्या जीवनाकडे क्रियाशील व सकारात्मक दृष्टीकोनातून पहावयास हवे. धम्म चळवळीने मला काय दिले यापेक्षा धम्म चळवळीमध्ये मला काय योगदान देता येईल या अनुषंगाने आपण धम्मचळवळीमध्ये सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांनी केले. ते यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगांव येथे आयोजित करण्यात आलेल्या धम्मपरिषदेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विचारपिठावर अध्यक्ष कृष्णाजी रंगारी, प्राचार्य डॉ. संजय गवई, सखाराम देवपारे, धम्मपाल माने, पराग पिसे, विनायक माहुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार घालून अभिवादन केले. याप्रसंगी पुढे बोलतना डॉ. गायकवाड म्हणाले की, गौतम बुद्ध हे जगातील पहिले वैज्ञानिक आहेत. ज्यांनी समग्र मानव जातीच्या कल्याणाचा विचार मांडला. चार आर्यसत्ये, अष्टांगमार्ग, पंचशील तत्वे व्यक्तीला नैतिकतावादी व सदाचारी बनण्यास प्रेरणा देणारी ठरतात. आजच्या समाजातील ज्वलंत




प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी गौतम बुद्धाची अहिंसावादी व शांततामय विचारसरणी उपयुक्त ठरते. उदात्त समावेशक, सामंजस्यपूर्ण सहजीवनासाठी व्यक्तीचा विचार दृष्टिकोन शीलवान व समाजाभिमुख बनला पाहिजे असेही ते म्हणालेयावेळी प्रमुख अतिथी महात्मा बसवेश्वर महाविद्यायाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी बुद्ध विहार हे संस्काराचे केंद्र बनले पाहिजे. त्या अनुषंगाने सर्वांनी सामुदायिकपणे प्रयत्न करणे व बौद्धिक,धार्मिक,सांस्कृतिक उपक्रम राबवणे गरजेचे आहे. शिक्षणातूनच माणसाला डोळस दृष्टी येते.त्यामुळे आपण नव्या पिढीला घडवताना त्यांच्या मनात शिक्षणाबद्दलची गोडी व आकर्षण निर्माण करणे आवश्यक आहे यावर त्यांनी भर दिला. सूत्रसंचालन संजय तिरपुडे यांनी केले तर आभार सम्राट बनसोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दुर्वास गवई, सुधाकर गडलिंग,राजेंद्र दातार,विनोद जीवतोडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास बाभूळगाव तालुक्यातील अनेक गावातील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### जस्टीन ट्रुडोंवर ट्रम्प

डोनाल्ड ट्रम्प १० दिवसांनी अमेरिकेचे नवे अध्यक्ष होतील. त्यापूर्वीच त्यांनी कॅनडा, पनामा आणि ग्रीनलॅन्ड यांची झोप उडवली आहे. यातील कॅनडावर विशेषत: तेथील पंतप्रधान जस्टीन ट्रुडोंवर ट्रम्प यांची विशेष नाराजी होती. त्यांनी कॅनडाला अमेरिकेचे ५१ वे राज्य बनवण्याचा प्रस्ताव दिला होता. एवढेच नाही तर ट्रुडो यांना या अमेरिकी राज्याचे गव्हर्नर करण्याचाही ट्रम्प यांचा प्रस्ताव आहे.

जगभरात ख्रिसमसची धामधूम सुरू असताना ट्रम्प यांनी पहिल्यांदा हे विधान केले होते. ट्रम्प यांच्या एकूण स्वभावाकडे पाहता तो गमतीचा विषय मानला जाऊ शकतो. तथापि, ट्रम्प यांनी नंतरही आपली हीच भूमिका मांडली आणि कालही त्याचा पुनरूच्चार केला. त्यांच्या बोलण्यातून विस्तारवादाचा किंवा नव्या साम्राज्यवादाचा दर्प येतो आहे. 'माझा घोडा तुम्ही अडवा आणि युद्ध करा अन्यथा माझे मांडलिकत्व पत्करा' असाच अर्थ त्यातून प्रतीत होतो. ट्रम्प किंवा त्यांची भावी अमेरिका कॅनडाबाबत खरेच असे करू शकते का, या प्रश्नाचे उत्तर 'हो' आहे. त्यांनी पूर्वीही तसे केले आहे आणि आताही ते करण्यात त्यांना फारशी अडचण संभवत नाही.

कॅनडाला आपले ५१ वे राज्य केल्यावर कॅनडाचाच कसा फायदा आहे हे ट्रम्प यांनी ऐकवले आहे. कॅनडात सध्या स्थिती चांगली नाही. ज्या ट्रुडोंना ट्रम्प यांनी जाहीर प्रस्ताव दिला होता त्यांनी राजीनामा दिला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या दोन देशांचे सहअस्तित्व असले तरी आजपर्यंत अशा प्रकारचा प्रस्ताव मांडला गेला नव्हता, ना त्याबाबत कधी बोलणी झाली होती. त्याचे कारण दोन्ही देशांची असलेली ऐतिहासिक मैत्री. ही मैत्री किंवा परस्परविश्वास किती घट्ट आहे याचा अंदाज केवळ एकाच गोष्टीवरून करता येऊ शकतो ते म्हणजे दोन्ही देशांत जगातील सगळ्यांत मोठी सीमारेषा आहे.

मात्र, ती खुली ठेवण्यात आली आहे. त्यात कुठलेही कुंपण आणि पहारा नाही किंवा कोणता वादविवादही नाही. स्थलांतर अथवा इमिग्रेशन आणि वातावरण बदल आदी मुद्द्यांवरून अमेरिका व कॅनडात काही मतभेद आहेत. तथापि, भाषा आणि संस्कृती समान असल्यामुळे सीमा वेगळ्या असल्या तरी दोन्ही देश एकरूप असल्यासारखीच स्थिती आहे. किंचित मतभेद असले तरी संबंध मैत्रीचे आणि शांततापूर्ण आहेत. ट्रम्प यांचे पूर्वसूरी आणि नंतरचे बायडेन यांनी कॅनडाबाबत 'जैसे थे' ठेवले होते.

आता ट्रम्प यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच अचानक या विषयाला हात घातल्यामुळे चर्चा सुरू झाली आहे. ही चर्चाही सामान्य असल्याचे दिसते. कॅनडात त्याचे संतप्त पडसाद अथवा साधे पडसादही उमटले नाहीत. आमच्या सार्वभौमत्वावर हल्ला वगैरे विधानेही कोणी केली नाही. हे सगळे असे दर्शवते आहे का, की कॅनडालाही ट्रम्प यांचा प्रस्ताव मान्य आहे? खुद्द अमेरिकेत याबाबत काय भूमिका आहे? एका देशाचे विलीनीकरण करायचे असल्यास स्वाभाविकच काही प्रक्रिया आहेत. दोन स्वतंत्र देश असल्यामुळे तेथे स्वतंत्र संसद आहेत आणि त्यांचे संविधानही आहेत.

त्यानुसार विचार करता कॅनडाला जर अमेरिकेत समाविष्ट हायचे असेल तर कॅनडाच्या संसदेची म्हणजे सिनेट आणि हाउस ऑफ कॉमन्सची संमती घ्यावी लागेल. शिवाय देशातील सर्व १० राज्यांच्या विधानसभांची मंजुरी आवश्यक असेल. तेथे अनेक पक्ष आणि मतप्रवाह आहेत. त्यामुळे अमेरिकेत विलयाच्या संदर्भात चटकन सहमती होईलच असे नाही. शिवाय त्यांच्या संविधानात अशीही तरतूद आहे की कॅनडातील एखाद्या भागाला जर अमेरिकेत जायचे नसेल तर तो भाग तसे करू शकतो पण; त्यांनाही हीच सगळी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

अमेरिकेत कॅनडाला सामील करून घेण्यास कोणाची ना असण्याचे कारण नाही. मुळात त्या देशाने आपल्या संपन्नतेच्या जोरावर पूर्वीही असे केले आहे व कोणत्याही लष्करी बळाचा वापर न करता वेगवेगळे प्रदेश आपल्यात सामावून घेतले आहेत. यातील काहींनी स्वेच्छेने अमेरिकेत विलय करून घेतला आहे. हवाई, टेक्सास, लुईसियाना आदी प्रांत त्याची ठळक उदाहरणे. यातील कोणी पूर्वी फ्रान्सचा भाग होते तर कोणी मेक्सिकोचा. ते अमेरिकेत समाविष्ट झाले. गमतीचा भाग म्हणजे अमेरिकेची राजकीय राजधानी असलेला भाग वॉशिंग्टन डीसी राजधानी तर आहे मात्र पूर्ण राज्य नाही.

स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळावा यासाठी प्रदीर्घ काळापासून त्यांचे प्रयत्न सुरू असले तरी सहमती झालेली नाही. वॉशिंग्टन डीसी कोणत्या एका राज्याच्या अधिकारात असू नये व या भागाने संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करावे अशी अमेरिकेच्या संसदेची भूमिका आहे. त्यामुळे हा विषय रखडला आहे व तसाच पोर्टो रिकाचाही. तेही राज्याचा दर्जा मिळण्यासाठी रांगेत उभे आहेत. लुईसियानाप्रमाणे अमेरिका कॅनडाची खरेदी करून त्याला आपले राज्य बनवू शकते. मात्र, हा मानहानीचा प्रकार अधिक होईल त्याचे कारण कॅनडा संपन्न आहे व त्यांची स्वत:ची एक प्रतिष्ठा आहे.

ट्रम्प ज्या आत्मविश्वासाने कॅनडाबाबत बोलत आहेत व त्यावर कोणते वादळही निर्माण झाले नाही यावरून खरेच कॅनडा अमेरिकेचे राज्य झाले तर ते धक्कादायक नसेल असे आज म्हणता येऊ शकते.

# अतिसामान्य ते असामान्य !

# ( काळजात जपलेलं एक नाव ! )

# गुरुवर्य डॉ.राजकुमार मस्के

काही व्यक्ती जन्माला येताना मोठे ध्येय घेऊनच येतात , त्या ध्येयासाठीच ती जगतात अजन्म तेच ध्येय उराशी बाळगून त्या ध्येयाच्या पूर्ततेसाठीच अविश्रांत कष्टतात.अविश्रांत परिश्रमातून काळाच्या पटलावर आपल्या कार्य–कर्तृत्वाचा ठसा उमटवून जातात.अशा उल्लेखनीय व्यक्तिमत्वाची नोंद इतिहास घेत असतो. अशाच एका ध्येयाने भारावलेल्या व ऐतिहासिक कार्य करणाऱ्या तपस्वी व्यक्तिमत्त्वाचा गौरव सोहळा आज संपन्न होतो आहे. याचा मनस्वी आनंद मला झाला आहे. नुकतीच गुरुवर्य डॉ.राजकुमार मस्के सर यांची महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या पूर्णवेळ प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल आणि त्यांच्या षष्टब्दीनिमित्ताने त्यांच्या स्नेही शिष्यसमुदायांनी घडवून आणलेला हा हृदयंगम सस्नेह व भव्य दिव्य असा न भूतो न भविष्यती असा सत्कार सोहळा संपन्न होतो आहे.याचा मनस्वी आनंद सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे मला सुद्धा आहे.सरांच्या गळ्यात या पदाची माळ पडणे हा काही केवळ योगायोगाचा,नशीबाचा वा भाग्याचा भाग नाही.तर त्यामागे उदयगिरीच्या गगनभरारी उंच हिमालयासारख्या यशोशिखरामध्ये वा प्रगतीमध्ये सरांचा सिंहाचा वाटा आहे. या प्रगतीच्या अनेक टप्प्यावर सरांनी वेळोवेळी अत्यंत मोलाची भर घातलेली आहे. या महाविद्यालयाचा व त्यात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी त्यांनी स्वतःचे तन–मन–धन अर्पण केले आहे. 'उदयगिरीचा विकास हाच आपला ध्यास'हे त्यांचे ब्रीदवाक्यच होते.त्याची खूनगाठच त्यांनी मनाशी बांधली होती. त्यांचे शरीर आणि मन उदयगिरीमय झाले होते. या महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागात व क्षेत्रात त्यांनी मोलाची भर घातली आहे. आदरणीय गुरुवर्य डॉ. राजकुमार मस्के सरांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे. त्यांच्या प्रत्येक पैलूंनी या महाविद्यालयाचा चिरा न् चिरा घडविलेला आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वात असलेली सर्वच कौशल्ये सरांनी या महाविद्यालयाच्या जडणघडणीसठी व आपल्या विद्यार्थ्यांच्या जीवनास पैलू पाडण्यासाठी खर्च केलेला आहे. महाविद्यालयातील वादविवाद मंडळ, एन.एस.एस,एन.सी.सी. विद्यार्थी कल्याण मंडळ, सांस्कृतिक विभाग, मूल्यांकन नॅक विभाग यांसह महाविद्यालयाच्या विकासक्रमातील ज्ञानार्जन प्रक्रियेस पूरक ठरणारे इतरही अनेक विभाग सरांनी अत्यंत गंभीरपणे हाताळले. त्यात कुठलीही कसूर ठेवली नाही. आपल्या वाणीचा शब्द न् शब्द, मनाचा कोपरा न् कोपरा, त्यातील प्रत्येक संकल्प आणि त्या संकल्प पूर्तीसाठी केलेली कोणतीही कृती याच उदयगिरीच्या शिखराची सीडीच ठरली .



तुळजापूर तालुक्यातील अनसिंगा या छोट्याशा गावात अस्पृश्य जातीत जन्मलेल्या व वाढलेल्या गुरुवर्य डॉ. राजकुमार मस्के सरांच्या घरात पिढ्यानपिढ्या अठरा विश्व दारिद्र्य.आसपासच्या जगात व घरात शिक्षणाचा कसलाच वारसा नसताना सभोवतालचा अंधार नष्ट करण्यासाठी ज्ञानाची ज्योत पेटविण्याचा व ती निरंतर तेवत ठेवण्याचा वसाच त्यांनी बालपणी घेतला.कधी उपाशीपोटी तर कधी वडिलांना मिळालेल्या येसकरकीत मिळालेले शिळेपाके अन्न खाऊन तर कधी अर्धपोटी राहून आपल्याबरोबरच इतरांच्याही जीवनात हा ज्ञानरूपी प्रकाश पेरण्याचे काम ते आजन्म करीत राहिले. गावातले शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लातूर येथील म.बसेश्वर महाविद्यालयाच्या वस्तीगृहाचा आधार घेत पदवीचे शिक्षण पूर्ण करून पदव्युत्तर शिक्षणासाठी उदयगिरीच्या ज्ञान पंढरीकडे त्यांची पाऊले वळली. ही पंढरी जणू त्यांची वाटच पाहत होती. या महाविद्यालयात दोन वर्षे पदव्युत्तर शिक्षण त्यांनी पूर्ण केले. याच अध्ययनाच्या काळात त्यांनी आपल्यातील विविध गुणांची चुणूक दाखवून दिली होती. याच महाविद्यालयाचे तत्कालीन ध्येयनिष्ठ, प्रयोगशील व शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य आदरणीय ना.य.डोळे सरांनी त्यांची ही गुणवत्ता व त्यांचे विलोभनीय व हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व अत्यंत छान हेरले. या महाविद्यालयाचा कळस होण्याची त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वात असलेली क्षमता लक्षात घेऊन त्यांनी याच महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या आध्यापकपदी त्यांची नियुक्ती केली. त्यांनी केलेली ही अचूक नियुक्ती पुढे या महाविद्यालयाची पायाभरणीच ठरली. याचा प्रत्यय आज येतो आहे.

काही व्यक्ती आपल्या असामान्य कर्तृत्वाने अद्वितीय ठरतात. ती काळाच्या व युगाच्या पटलावर आपल्या असामान्य कर्तबगारिंने सर्वांना ललामभूत करतात. याच कोटीतील गुरुवर्य सर आहेत.आपल्याला मिळालेल्या या संधीचे सोने केले पाहिजे.हे काही त्यांना कोणी सांगायला नको मुळी. त्यांचा मूळ पिंडच एका तपस्वी शिक्षकाचा, समाजशील व कर्तबगार वाकबगाराचा होता. त्यामुळे या भूमीमध्ये ते स्वार होताच त्यांनी येथे ज्ञानदानाचे जणू छायाछत्रच उघडले.

या ज्ञान छत्राखाली येणाऱ्यांना त्यांच्या ज्ञानवल्लीची घनदाट सावली मिळाली. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या छत्र छायेखाली घेऊन त्याला ज्ञानामृत पाजण्याची शिकस्त त्यांनी केली. गुणग्राहकता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अनमोल दागिना आहे. आपल्या विद्यार्थी दशेपासूनच त्यांनी आपल्या अमोघ वाणीने वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा गाजवली. परोपकार, विद्यार्थ्यांबद्दल सहानुभूती,शील संवर्धन,नैतिकता चारित्र्यसंपन्नता,शिस्त,संयम, विनम्रता, क्षमाशीलता, सहनशीलता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध अंगभूत पैलू आहेत. या विविध पैलूंबरोबरच चिंतनशीलता,गंभीरता, समाजशीलता आणि टापटीपपणा हेही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष आहेत. न्यूनगंडाचा वारा त्यांच्या मनाला कधी शिवलाच नाही. तसेच यश, कीर्ती, पद आणि प्रतिष्ठा यांची झिंगही त्यांना कधी चढलीच नाही.

आपल्या वर्गखोलीतील व महाविद्यालयातील विद्यार्थी घडला पाहिजे. यासाठी माझ्यासकट अनेक बिकट परिस्थिती असलेल्या इतरही अनेक विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्थितीगतीवर अगदी बारकाईने लक्ष ठेवून,संकटाच्या व दलदलीच्या चिखलातून बाहेर काढून अत्यंत तळमळीने त्यांना प्रगतीच्या मार्गाकडे नेणारे आदरणीय गुरुजी शिक्षण क्षेत्राला जणू वरदानच ठरले आहेत. त्यांचा पिंड जसा एका हाडाच्या शिक्षकाचा आहे. तसाच तो एका समाज चिंतकांचा व समाज सुधारकाचाही पिंड आहे. म्हणूनच वर्गातील विद्यार्थी घडवीत समाजाचीही बिघडलेली घडी नीट बसविण्यासाठी ते अविरत कार्यरत आहेत. प्रभावी व परिणामकारक अध्यापन व व्याख्यान हा तर त्यांचा स्थायीभावच आहे. त्यांच्या अध्यापनातून त्यांनी रंगविलेल्यि विविध घटना, प्रसंग आणि व्यक्ती आजही मनात रुंजी घालतात. त्यांनी पदव्युत्तर वर्गाला स्पेशल ऑर्थर म्हणून शिकविलेले व्यंकटेश माडगूळकर यांच्या सर्व साहित्यानिशी आजही मनामध्ये तेवढ्यात जिवंत आहेत. त्यांचे हे प्रभावी अध्यापन हा त्यांच्या अद्वितीय व्यक्ती महत्त्वाचा एक परीसच आहे.या परिसाचा स्पर्श त्यांच्या ज्या ज्या विद्यार्थ्यांना झाला. त्यांच्या जीवनाचे सोनेच झाले. त्यांची ही परिणामकारक अध्यापन व वक्तृत्वशैली अनेक विद्यार्थ्यांसाठी अनुकरणीय ठरली आहे.गुरुच्याच परिसस्पर्शाने ती प्रभावी ठरली आहे.याच प्रभावी वाणीचा दरवळ आज महाराष्ट्रातल्या विविध महाविद्यालयातून त्यांच्या विद्यार्थ्यांच्या रूपाने दरवळताना दिसतो आहे. त्यांनी दिलेली अध्यापनाची ही एक कधी न सरणारी शिदोरीच आहे. त्याच शिदोरीवर आज आम्हा सर्व विद्यार्थ्यांचा अध्यापन पिंड पोसला जातो आहे.



आपल्या या अमोघ वाणीने त्यांनी उभा महाराष्ट्र छ.शिवाजी महाराज, म.फुले,छ.शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर व अण्णा भाऊ साठे यांच्यासह इतरही महापुरुषांच्या महनीय विचारांनी ढवळून काढला आहे. महापुरुषांच्या विचाराचा समृद्ध वारसा समाजातील तळागाळातील माणसांपर्यंत पोहोचण्यासाठी सबंध महाराष्ट्रभर पायपीट करणारे गुरुजी मी स्वतः पाहिले आहेत. केवळ एक तासाच्या व्याख्यानासाठी २० तास प्रवास करणे हे खरे म्हणजे असामान्य व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीचेच अनन्य साधारण कर्तव्य आहे. ज्ञानदानाच्या कार्याबरोबरच समाज सुधारणेच्या कार्यासही त्यांनी स्वतः ला वाहून घेतले आहे. हे 'विश्वचि माझे घर' या ज्ञानेश्वरांच्या विचारांनी त्यांच्या मनात घरच केले आहे.

ल.सा.क.म. सारख्या सामाजिक संघटनेच्या कार्यातही त्यांनी काही काळ स्वतःला वाहून घेतले होते. त्याचा महाराष्ट्राभर विस्तार करण्याचे अतुलनीय कार्य त्यांच्या हातून घडले आहे. साहित्य, संगीत आणि नाट्य यांसह विविध ललित कलांची आवड जोपासणा– या सरांनी साहित्याची चळवळ वृद्धिंगत करण्यासाठीही भरीव कार्य केले आहे. आपल्या काव्यसंग्रहातील काव्यसंग्रहातील कवितांमधून त्यांनी समाजाला क्रांतीचा व समाज परिवर्तनाचा विचार दिला. 'आंबेडकरवादी साहित्य आणि समीक्षा' हा त्यांच्या चिंतनाचा विषय. विविध साहित्यिक मेळाव्यातून साहित्य संमेलनातून,साहित्य परिषदांमधून व साहित्यावरील चर्चासत्रांमधून आपले मौलिक व मुक्त चिंतन मांडणाऱ्या सरांनी या क्षेत्रात घातलेली भर ही लक्षणीय आहे. सर अजातशत्रू ,मनमिळाऊ व संवेदनशील आहेत. कठोरपणे त्यांनी कधी कोणाचा अवमान केल्याचे, कोणाचे मन दुखावल्याचे मी अद्याप पाहिले नाही. या स्वभावामुळे त्यांची अनेक वेळा अडचणही झाली आहे. एखाद्याचे मन दुखवणे हे तर त्यांना कधीच जमले नाही. खरे म्हणजे हा काही त्यांचा दोष मानता येणार नाही. तर ती त्यांची स्वाभाविक वृत्तीच आहे. त्यामुळे काही अपवादात्मक व्यक्ती त्यांच्यापासून दूर गेल्या असतील; परंतु अशा व्यक्तीबद्दलही सरांनी कधी आकस भावना ठेवली नाही.तर त्यांनाही सरांनी समजून घेतले, आपल्या विशाल अंतकरणात सामावून घेतले.खरे म्हणजे यासाठी बुद्धांच्या विचारातील करुणाच जतन करावी लागते. त्यासाठी लागणारे बहिणाबाईंच्या शब्दात व्यक्त झालेले आभाळाएवढे मन सरांकडे निश्चितच आहे. त्यांच्या कौटुंबिक व व्यक्तिगत जीवनातही आलेले अनेक,चढ उतार मी त्यांच्या कुटुंबातील एक सदस्य या नात्याने अत्यंत जवळून पाहिले आहेत. एखाद्या संकट रुपी वादळाने ते कधी मोडून पडले नाहीत, तर जीवनात कोणत्याही मिळालेल्या यशाने व सन्मानाने ते कधी हुरळून गेले नाहीत. मानवी जीवनाच्या सुख, दुखात्मक चढ, उतारांच्या प्रवासात मनाचा जो एक समता भाव किंवा समतोल अवस्था असावी लागते. ती सरांकडे निश्चितच आहे. एका बलाढ्य व्यक्तीने आपल्या ऊण्यापुऱ्या एका आयुष्यामध्ये कष्टाचे किती डोंगर चढावेत त्याला काही परीघच नसतो. ज्याच्या पंखात आकाशव्यापी विहार करण्याचे बळ असते.ते सदैव आकाशभ्रमणच करत असतात. त्यासाठी त्यांना आकाशही पूर्ण नाही.अशा आकाशव्यापी कर्तृत्वाची अचाट क्षमता असलेल्या आदर्श गुरूंचा शिष्य होण्याचे भाग्य मला लाभले. याचाही मनस्वी आनंद मला आहे.अशी अपार क्षमता असणारे गुरुवर्य डॉ.राजकुमार मस्के सर यांना त्यांच्या या कार्यकर्तृत्वाचा सन्मान म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सन्माननीय संस्थापक मंडळाने त्यांची या महाविद्यालयाच्या पूर्णवेळ प्राचार्यपदी नियुक्ती करुन त्यांच्या या असामान्य कार्यकर्तृत्वाचा गौरवच केला आहे. तसेच त्यांना या ज्ञानरूपी आकाशात भ्रमण करण्यासाठी त्यांच्या पंखात बळ दिले आहे.त्याबद्दल आमचा सर्व शिष्यगण समुदाय या संस्थेच्या कायम ऋणात राहील. ज्ञानाची,यशाची कीर्तीची संपन्न व उज्वल परंपरा असलेल्या या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी सरांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांना त्यांना पुढील कार्यासाठी कोटी कोटी शुभेच्छा! तसेच त्यांच्या शष्टब्दीनिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो, समृद्ध आरोग्य लाभो. त्यांच्या जीवनात आनंदी आनंद भरून ऊरो. हीच याप्रसंगी सदिच्छा!

-------------------------

डॉ लहू दिगंबर वाघमारे
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय,नळेगाव ता.चाकूर जि. लातूर
इमेल ुरसहारीशश्रवसारळश्र.लो

# अबोल झालीस का?

राजू बोरकर
७५०७०२५४६७

दिनेशचं लग्न झालं . त्याला बीए शिकलेली मुलगी मिळाली. सोनेरी केस, लांब नाक, गोल चेहरा.. हे वर्णन अतिशय बुटकं आहे. तिचं वर्णन करायला माझ्याकडे शब्द नाहीत. आणि वर्णन करण्यइतका मी साहित्यिक नाही .पण ती सुंदर होती. आकर्षक होती. कोणत्याही तरुणाला तिच्याकडे क्षणभर बघावसं वाटेल. तिच्या नजरेत जादू आहे .बोलण्यातही ती मागे नाही. तिच्या भाषेत माधुर्य होतं. कुणालाही पटकन आकर्षूण घेण्याचं तिचं कसब निश्चितच वाखाणण्यासारखं होतं. तिचं नाव सुद्धा तिला शोभेल असंच आहे. आणि खरं सांगू , तिचे वस्त्र किंवा दागिने तिची शोभा वाढवतात असं म्हणण्यापेक्षा तिचं शरीरच त्या वस्त्रांची किंवा दागिन्यांची शोभा वाढवतं असं म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. निसर्गाने तिची घडण करतांना कोणतीही उणीव ठेवलेली नाही. किंवा थोडाही कंजूसपणा केला नाही. सौंदर्याचा उत्तम नमुना म्हणजे माधुरी !तुम्हाला प्रश्न पडला असेल हा दिनेश कोण? दिनेश माझा शेजारी आहे .अगदी प्राथमिक शाळेत पासून तो माझा वर्ग बंधू आहे. आणि गाव नात्याने ही बंधू आहे. पण या नात्यापेक्षा आम्ही मित्र चांगले आहोत. त्याच्या लग्नाचा बराच हिशेब मी ठेवलेला आहे. मला चांगलं आठवतं ,लग्नात त्याला टिका लावून त्यांची डोकी आपटणारा मी एकमेव असेल. शांत स्वभावाचा दिनेश त्यावेळी माझ्यावर जाम भडकला होता . कारण त्याला दुखावलं होतं. माधुरीने मंडपातच शांत राहण्याची त्याला विनंती केली होती . तिच्या शब्दाखातर तो शांत झाला होता. वरात येताच त्याने माधुरीशी माझा परिचय करून दिला. ती हसली आणि का कुणास ठाऊक, पण ते स्मित माझ्या मनाच्या खोल दरीत प्रवेशलं. वहिनी दीर ह्या नात्याने आमच्यात परिहासात्मक संबंध होते. मी तिची टर उडवायचो. माझी टर उडविण्यात दिनेश तिला साथ द्यायचा.. कधी दोघे मिळून माझ्या सखीच्या नावाने मला चिडवायचे. कित्येकदा मी सखीचा विचार करतांना माधुरी डोळ्यांपुढे थिरकायची. इतकी सुंदर बायको दिनेशला मिळालीच कशी असा प्रश्न मला नेहमीच पडायचा. दिनेश, होय दिनेश निश्चितच सुंदर आहे .पण तो साधा मास्तरड्या असतांना डॉक्टर इंजिनियर ची बायको होण्याची लायकी असणारी माधुरी त्याला मिळावी हे माझ्यासाठी फार मोठं आश्चर्य होतं .दिनेशचं वाईट व्हावं अशी माझी कामना नाही . तो माझा फार जवळचा मित्र आहे .त्याहूनही तो पामर आहे. कॉलेजात चार मुलं वागतात तसा तो कधीच वागला नाही. नेहमी नाकासमोर चालणारा दिनेश आदर्श विद्यार्थी ठरला होता .मग मी त्याच्याबद्दल असा विचार का करतोय? मला त्याच्या बायको बद्दल ओढ आहे का? नाही मला माधुरी बद्दल आकर्षण नाही. अगदी कवडीचं सुद्धा नाही. मग मी त्याचा हेवा का करतोय ?मला त्याची बायको सुंदर का वाटतेय ? या प्रश्नांनी मी गोंधळतो. निशेचा विचार मनात आला की मला वाटतं ही आपल्यावर पूर्ण विश्वास टाकून आहे. तिच्याशी मी फितूर होऊ नये . मग माधुरीचा विचार करण्यापेक्षा मी निशेचा विचार करू लागतो .माझ्या कडकीच्या दिवसातही ती माझ्याशी एकनिष्ठ राहीलय. बरेचदा माझ्या परीक्षा शुल्काचे पैसे तिने भरले होते. मला नोकरी नाही तरी तिचं प्रेम कमी झालं नाही. ती आजही मला धीर देते. अंधारातही प्रकाश शोधण्यास मला तिनेच शिकवलंय. पर्णहिन जंगलात हिरवळ शोधण्यास मी तिच्यामुळे शिकलोय. ग्रीष्मातही पावसाळा शोधण्याची कला तिच्याकडून साध्य करून घेतलीय. एकूण आपल्याकडे काही नसताना समाधानाने जगण्याची कला प्रत्येकाला साधत नाही किंवा अशा प्रकारे जगण्याची कला कुणी कुणाला शिकवू शकत नाही . पण ही कला निशेकडे आहे . तिने ती कला मला शिकविली आहे. शेक्सपियरने एका कवितेत प्रेम आढळ दीपस्तंभ आहे ते दिवसात आठवड्यात कधी बदलत नाही . प्रेम दिशादर्शक तर आहे असं लिहिलंय ते निशेबद्दल शंभर टक्के खरं वाटतं .तिचं प्रेम निश्चितच दिशादर्शक तारा आहे. मग मी माधुरी वहिनीचा विचार का करावा! मी मनाशी ठरवलंय .आजपासून माधुरी वहिनीचा विचार करणार नाही. केला तरी ती निशेपेक्षा सुंदर हे असं कधी समजणार नाही . मनाशी पक्क ठरविलं. माझ्या विचारांची अंमलबजावणीही केली....

एक दिवस मी बेधडक त्याच्या खोलीत प्रवेशलो . दिनेश माधुरीचं चुंबन घेताना दिसला .ते मला कसंतरी वाटलं . मी माघारी फिरणार होतो .पण माझ्या पायांचा आवाज झाला .मी काही बोलण्यापूर्वीच तो म्हणाला ,

पहिलंस असं असतं वैवाहिक सुख!

त्याच्या बोलण्याने वहिनी काहीशी लाजली . आणि दुसऱ्या खोलीत गेली . ती गेल्याची संधी साधून मी म्हटलं ,

काय बे काय लाज वाटते की नाही?

शरमेची जागाच उघडी पडल्यावर शरम वाटून काय उपयोग .

दिनेश अशा प्रकारे विनोद करू शकतो किंवा हे मला त्या दिवशी कळलं . लग्नापूर्वी तो सहसा हसत नव्हता. नेहमी शांत बोलणारा , साठ सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्याप्रमाणे विचार करून बोलणारा दिनेश त्या दिवशी प्रथमच इतका खट्याळ वाटला. अशाप्रकारे त्याच्या खोलीत प्रवेश करून त्याच्या प्रणय क्रिडेत व्यत्यय आणल्याचं मला ही वाईट वाटलं. इथे मी दिलगिरी व्यक्त करण्याची भाषा वापरली. मी म्हणालो,

दिन्या मला माफ कर....

माफ कर काय एवढा मोठा घोडा झालायस आता वाजवून घे एकदाचा. किती दिवस निशाजींना प्रतीक्षा करायला लावणार आहेस ?

असं म्हणून तो हसू लागला. इतक्यात माधुरी वहिनीने चहाचे कप घेऊन तुम्ही प्रवेश केला. तिने एक कप दिनेशला दिला .आणि दुसरा कप घेऊन माझ्याकडे वळत म्हणाली,

खरच आता वाजवायलाच पाहिजे तुम्ही.

लग्न म्हटलं की वाजवायलाच पाहिजे का?

माझ्या प्रश्नाला त्यांनी एक आवाजी उत्तर दिलं .

नक्कीच

पण मी वाजवणार नाही .नोंदवणार आहे .

अनेक मजली हसत मी उत्तरलो दिनेश म्हणाला,

अरे घोड्या निशाजींचे आई बाबा तसे तयार होतील का?

आई बाबा कशाला ? खुद्द निशाजी तयार आहेत मिया बीबी राजी तो क्या करेगा काजी

जुन्याच म्हणीला मी उजाळा दिला. माझ्या उत्तरावर माधुरी खूप हसली. ती हसली आणि माझ्या डोळ्यात डोळे घालून बोलण्याचा प्रयत्न करू लागली की मी खाली मान घालायचो. मला तिच्याविषयी आकर्षण वाटू नये म्हणून हाच एक प्रतिबंधक उपाय होता.

थट्टा म्हणून दिनेश आणि माधुरी निशेविषयी बोलायचे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून घरील मंडळींनी लग्न उरकून घेण्यास विनंती केली होती. पण मी माझा हा ना तो प्रॉब्लेम पुढे करून लग्नाचा विषय टाळत आलोय. पण आता अधिक टाळाटाळ करण्याची सोय उरली नव्हती. शिवाने माझ्यावर प्रचंड विश्वास टाकला होता. त्यामुळे आता तिला अधिक प्रतीक्षा करावी लागू नये म्हणून मी रजिस्टर मॅरेज करायचं ठरवलं . तशी तयारीही सुरू केली होती.....

तर अशाप्रकारे दिनेशचे लग्नानंतरचे दोन-तीन महिने अतिशय आनंदात गेले होते. अर्थात आमच्या घराची दारं एकमेकांपुढे आहेत म्हणून मी खात्रीपूर्वक सांगू शकतो .त्यांच्या सुखदुःखात मी ही वाटेकरी होतो.

एकदा मी आठ-दहा दिवसांसाठी बाहेर गेलो .परत आलो तेव्हा दिनेश ची प्रकृती बरी नसल्याचं कळालं. त्याला तात्काळ जाऊन भेटलो . त्याच्या डोक्यावर हात ठेवून विचारलं,

का बे प्रकृती का बिघडवलीस? त्यांनं अंगावरील सादर बाजूला सारली. कंबर वर सरकवून उशिला पाठ टेकवत तो म्हणाला,

म्हणाला कुठे काय ? तू बाहेर गेला होतास ना मग लवकर यावंस म्हणून सोंग घेतलय आजाराचं.

स्वतःचं दुःख दाबून विनोद निर्माण करण्याचा त्यांना प्रयत्न केला. पण कृत्रिम आणि नैसर्गिक विनोदात फरक असतो. असत्याने सत्य झाकता येत नाही. कितीही आव हाणला तरी सत्य डोळ्यात आणि चेहऱ्यावर स्पष्ट जाणवतं .तो काहीच झालं नाही अशा अविर्भावात बोलला .पण त्याचे डोळे दूर कसला तरी शोध घेत होते .चेहरा विचारक्रांत झाला होता. सत्य जाणून घेण्यासाठी म्हणून मी त्याला विचारलं,

काय झालंय दिनेश , नक्की ?

काही नाही. अचानक प्रकृती बिघडलीय.

अचानक !अचानक कशी काय?

अचानक म्हणजे अकल्पित.

हे बघ ,विनोद करून मला टाळता येणार नाही.

विशेष काही नाही रे! खाण्यापिण्यातच गडबड झाली असावी .

पण नेहमी दक्ष असणारा तू गडबड घोटाळा होईपर्यंत बेपर्वा झालास कसा?

नेहमी दक्ष असणारा माणूस कधीतरी बेपर्वा होतोच.तसंच काहीसं झालंय .

ह्या अल्पशा आजारात तू किती वीक झालायस.

अरे काही झालं नाही. ते जाऊ दे तुझ्या बहिणीबद्दल विचारलं नाहीस अजून .ती फार आठवण करायची तुझी.

दिनेशने माधुरीची आठवण करून देताच माझ्या काळजात धस्स झालं. का कुणास ठाऊक पण तिच्या विषयी माझ्या मनात एक अनामिक ओढ होती. तरी मी स्वतःला सावरलं होतं. तिच्या मनात माझ्याविषयी अशी भावना असेल की नाही याची मला माहिती नव्हती. मी तिच्याबद्दल किंवा दिनेश बद्दल वाईट विचार करणार नाही असा विचारही पक्का केला होता . तिच्याप्रती माझ्या मनात निर्माण झालेले विचार मी कोणालाही सांगितले नव्हते. मग ही माझी अंदर की बात दिनेशला कशी समजली? त्याला नक्कीच समजली असेल का?छे! शक्यच नाही! मी कुठे बोललोच नाही तर ते त्याला कळायला मार्ग तरी कुठे आहे? ते त्याला का कळलं नसेल? माधुरी वहिनीचं माझ्याकडे पाहानं, ते तिचं हसणं कुठे लपून आहे ? मी माझ्या दोन मनाच्या द्वंद्वात सापडलो. आता अधिक विचार करण्यात अर्थ नव्हता .मी म्हटलं,

नाही कसं? विचारणारच होतो की! पण वहिनी विषयी विचारण्यापेक्षा प्रथम तुझी प्रकृती विचारणं मला अधिक महत्त्वाचं वाटतं .

मी ठीक आहे.

त्याचं समाधानाचं लेप लावलेलं उत्तर. माझ्या मनातील चोरटेपणाला सावरण्याचा सावरण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालो,

मग सांग वहिनी कुठे दिसत नाही . ती आहे ना इथे की माहेरी पाठवलंस?

आहे रे .जरा दुकानात गेलीय.

दुकानात! ती कशाला गेलीय?

तू नव्हतास ना.

तो हसत उत्तरला .

मग शेजारच्या पोरांना पाठवायचं ना!'

वेळेवर असतील तेव्हा ना .

आणि तेवढ्यात माधुरी वहिनी आली.

तिच्या हातात एक छोटी पिशवी होती .त्यात विशेष समान नव्हतं. बहुतेक त्या वस्तू तिच्याच उपयोगाच्या असाव्यात .ती येताच टिंगलबाजीला सुरुवात झाली. मग नको नको म्हणतांना तिने चहा ठेवला. मी चहा संपवला .इकड तिकडचं बोलणं संपल्यावर उठलो. त्याला काळजी घेण्याविषयी सूचना केली. आणि मी माझ्या घरी परतलो.

आठ-दहा दिवसात त्याची प्रकृती थोडी बरी दिसू लागली. त्याच्या संस्थेचे शिक्षक ,सचिव ,...इत्यादी लोक त्याला भेटत असत. पण त्याच्या आजाराचं कारण नक्की कुणाला कळलं नव्हतं . सुट्या संपल्यानंतर तो पुन्हा कामाला लागला . पण त्याच्यात पूर्वीप्रमाणे उत्साह नव्हता. सुट्टी झाल्यानंतर घरी परतांनख त्याच्या चेहऱ्यावर विचारांनी कुठलेसे जाळे विणल्याचं स्पष्ट जाणवत होतं. कसल्या विचारात तो रंगत होता हा नाकलनीय प्रश्न मलाच नाही तर खुद्द माधुरीलाही होता .

एक दिवस मी घरी एकटाच होतो. ते उन्हाळ्याचे दिवस होते. आई रानात गोवऱ्या वेचायला गेली होती . बाबांनी कानाला अर्धवट विडी खोचून हॉटेलात हजेरी लावली होती. मी दाढी करायला सामान घेतलं.

आणि अचानक वाहिनीने प्रवेश केला. तिच्या अचानक आगमनाने मी गोंधळलो नाही . त्यापूर्वी ती अनेकदा आली होती. दिनेश घरी असताना, नसताना किंवा त्यांच्या घरातील मंडळी असताना नसताना ती आली होती . तिचं आगमन म्हणजे भाजीपाला आणून दे, दुकानात जा अशा प्रकारे मी कामात येत असे . तिचं आगमन म्हणजे कुठल्यातरी कामाचं आगमन आहे हे ठरलेलं होतं. आताही ती कुठलं तरी काम घेऊन आली असणार म्हणून मी विचारलं,

बोला काय सेवा करू ?

सेवा करण्यास नक्की सज्ज आहात?

तिने हळूच प्रश्न केला . मी आरशात पाहून दाढी करत म्हणालो ,

तुला नकार दिलाय का कधी?

मला विश्वास आहे तुम्ही नकार देणार नाही.

ती प्रचंड आत्मविश्वासाने बोलली. सांगेल ते काम करण्याच्या सिद्धतेने मी म्हटल,

मग लवकर सांग .तुझं काम झालं म्हणून समज.

प्रथम चेहरा साफ करून घ्या.

मी चेहऱ्यावर पाण्याचे हबके मारून आरशात बघत टॉवेलाने चेहरा कोरडा करीत म्हणालो,

हं आता बोल.

जवळ या.

मी आरशात बघत म्हटलं,

माझे कान साफ आहेत.

तरी आणखी जवळ या.

मी गाफील पणे थोडा तिच्याजवळ गेलो . तिने माझ्या गालावर ओठ टेकवले. आणि क्षणात तिला दुर लोटलं आणि म्हणालो,

हा काय मूर्खपणा आहे ? कुणी पाहिलं तर काय विचार करतील? तू काय करते आहेस याचं भान आहे का तुला ?..

बेभान व्हायला मी नशेत नाही. मला भान आहे . आणि मी काय करतेय याची जाण आहे. आय लव यू!

वहिनी मला तुझ्याकडून अशी अपेक्षा नव्हती.

कशी?

असं वर्तन करशील अशी.

प्रेम करणं वाईट आहे ?

कसलं प्रेम?

प्रेमाचा अर्थ न कळण्याइतके तुम्ही नादान नाहीत. प्रेमाचा अर्थ मी कशाला सांगायला हवा.

तुला प्रेमाचा अर्थ कळतो ? प्रेम म्हणजे काय ते तू सांगू शकशील?

मी जरा चिडूनच विचारलं माझ्या प्रश्नांची उत्तरं देण्याऐवजी ती क्षणभर शांत राहिली. मग म्हणाली,

तुमचं माझ्यावर प्रेम नाही?

तिच्या प्रश्नाने मी गोंधळलो. आज पर्यंत मी तिच्या स्वभावाचा मनमोकळेपणा समजत होतो. पण ती माझ्यावर भाळली होती . मी एकटाच स्वप्न रंगवत नव्हतो. ती सुद्धा स्वप्न बघत होती. आणि दोघांचेही स्वप्न साकार होण्याचा सुवर्ण प्रसंग आमच्या स्वागतासाठी चुंबनाच्या वर्षाव फुलांची माळ घेऊन शांत उभा होता. कुठलाही आचार विचार न करता मी तिच्या गालावर चुंबनांचा वर्षाव करू शकलो असतो. इथे माझ्या घरी ती स्वतः आली होती. आणि घरी तिच्या व माझ्याशिवाय तिसरी व्यक्ती नव्हती. बाहेर शांतता होती. ऊन फार रखरखत होतं. त्या उन्हात दूरचे कौलारू घरं जळत असल्यासारखे वाटत होते. अधून मधून पोरासोरांचा आवाज कानावर येत होता. शेजारच्या पर्वती बाईंच्या अंगणातील कडुनिंबाच्या झाडावर कावळा सारखी काव काव करीत बसला होता .'कोण पाहुणा येते तं सांगा नं उडून जा रे कावळ्या ' ह्या आवाजाने मी सावध झालो. सावध होणं भागच होतं. कारण आवाज पार्वती बाईंचा होता. वेटाळातील प्रत्येक माणूस पार्वती बाईशी वचकूनच वागत असे. सुमारे पन्नाशीच्या जवळपास असलेली ही बाई नावाप्रमाणे पार्वती नव्हती . ती म्हशीसारखी काळी होती. डोळे मोठे होते . नाक अपेक्षेपेक्षा पुढे आलेला व शेंड्यावर बराच वक्र झालेला होता. ओठ जाड व वर्णनाप्रमाणेच काळे होते .वरच्या जबड्याचे दोन दात एखाद्या हत्ती सारखे ओठांच्या बाहेर आले होते. कजाकपणात तिचा हात कोणी धरू शकत नव्हते. ह्या बाईने दुसऱ्यावर देखरेख ठेवणे ,पाळत ठेवणे, भांडण करणे , लहानसाहान प्रसंगावरून शिवीगाळ करणे यात विशेष प्राविण्य मिळविले होते. तिने चांगली कामे केल्याचं किमान माझ्या लक्षात नाही. दिसायला जशी काळी तशीच विचारांनीही ती काळी होती. माधुरी वहिनी माझ्या घरात आल्याचं तिनं बघितलं असेल आणि आम्ही काय बोलतोय हे ती चोरून ऐकत असेल अशी शंका मनात आली . मग आपोआपच हृदयाचे ठोके वाढले. कुडाच्या भिंतीला खिडकी सारखं भोक होतं . त्यातून मी वाकून पाहिलं. पण ती आसपास दिसली नाही . आता मला थोडा धीर आला. मी माधुरीकडे वळलो आणि म्हटलं , तू विवाहित आहेस . सोन्यासारखा सुंदर संसार आहे तुझा. तो उध्वस्त का करून घेतेयस?

दिसायला फक्त सोन्यासारखा आहे. तिच्या बोलण्याचा अर्थ न कळाल्याने मी म्हणालो, म्हणजे दिनेश बद्दल तुझी तक्रार आहे ? माझ्या प्रश्नाचं तिने होकारार्थी मान हलवून उत्तर दिलं.

काय तर त्रास आहे? त्यांच्या आजारापासून ते जरा विचित्र वागतात. तिच्या बोलण्याचा नीटसा. अर्थ न कळल्याने मी विचारलं, विचित्र म्हणजे ? ते मला स्पर्श करीत नाही.

ठीक आहे .आज दिनेशला मी चांगला खडसावतो.तो शाळेतून येताच त्याला विचारतो.... आतापर्यंत ती गंभीर होती. माझ्या बोलण्याने ती हसली .मी तिच्याकडे नुसताच प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं . ती तशीच हसत राहिली .मग हसतच म्हणाली,

वेडेच आहात तुम्ही! आमच्यातील गुपित तुम्हाला कसं कळलं म्हणून ते विचारतील तेव्हा काय सांगाल?

मी इतका सूक्ष्म विचार करणारा असूनही ही साधी बाब माझ्या लक्षात आली नाही कदाचित माझं मत बोलून न दाखवता मी दिनेशला विचारलं असतं तर फार मोठा गोंधळ निर्माण झाला असता .दिनेश आणि मी जी कोणत्याही गोष्टी एकमेकांपासून लपवून ठेवल्या नव्हत्या. पण दिनेशने ही गोष्ट लपवून ठेवली होती. काय कारण असावं? छे! त्याने आपली प्रायव्हसी मला का सांगावी? दिनेशला माझा संशय तर आला नसावा? असा प्रश्न माझ्या मनाच्या किनारीला स्पर्श करून गेला . मी मनात तिचे आभार मानून थोडा विचार करीत म्हणालो,

म्हणजे एकंदर असं आहे तर! म्हणूनच तुला माझी गरज भासलीय होयना?

माझं तुमच्यावर जीवापाड प्रेम आहे...

तुला शारीरिक सुख हवंय. आणि ते सुख माझ्याकडून हवंय.

माधुरी बोलण्यात फार तरबेज होती ती लगेच म्हणाली,

मला तुमचं प्रेम हवंय.

केव्हापासून प्रेम जडलंय माझ्यावर?

बरेच दिवसांपासून.

मी तिला समजावण्याच्या सुरात म्हटलं,

वहिनी तू विवाहित स्त्री आहेस. विवाहित स्त्रियांच्या मनात परक्या पुरूषांबद्दल प्रेम निर्माण होत नाही.

प्रेमाला विवाहाचं बंधन नाही .किंवा वयाचंही बंधन नाही . ती मानसिक भावना आहे. केव्हाही ती उफाळून येऊ शकते. ती तशी रास्त बोलली होती. तिच्या बोलण्याने मी क्षणभर तिच्याकडे बघत राहिलो. तिच्या विचारांचं मी समर्थन केलं असतं तर ती जिंकली असती. आणि तसाही ती किंवा मी हरण्या जिंकण्याचा प्रश्नच नव्हता. म्हणून मी तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून म्हणालो,

असेल कदाचित तसंही . पण असल्या प्रेमाला समाजाची मान्यता कुठे आहे?

तुमचं मत काय ?

मी समजशील प्राणी आहे. समाज जे सत्य म्हणेल तेच मलाही मान्य आहे .

मी सावध उत्तर दिलं .आणि तिने लगेच प्रश्न केला ,

माझ्या भावनांचं मोजमाप कशाने कराल?

तिने कठीण प्रश्न विचारला. त्या प्रश्नाचं निश्चित उत्तर माझ्याकडे नव्हतं. कारण विवाहित स्त्रियांनी अविवाहित पुरुषांशी प्रेम संबंध ठेवल्याचं किंवा विवाहित पुरुषांनी अविवाहित तरुणशी प्रेम संबंध ठेवल्याचं मी पुष्कळदा ऐकून होतो. एक दोन उदाहरणही माझ्या पुढे उभी होती . त्यात अधिक प्रमाणात वासना असेल. पण कित्येकांचं खरं प्रेमही असेल . म्हणजे माधुरी वहिनींच्या बोलण्यात दम होता, हे मी मनात नाकारू शकलो नाही. तिच्या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी मी विचार करू लागलो. आणि तिने तोच प्रश्न पुन्हा ठासून विचारला. आता तिच्या प्रश्नाचं उत्तर देणं मला भाग होतं . मला शक्य होईल तितका कठोर होऊन मी म्हणालो,

तुझ्या प्रश्नाचे अचूक उत्तर मला आज तरी देता येणार नाही .पण तुझ्या भावनांना आज तरी प्रेम ही संज्ञा मी देऊ शकत नाही. कारण समाजाची तशी परवानगी नाही. समाजाच्या दृष्टीने या भावनांना व्यभिचार असं नाव आहे . आज तू जे नातं जोडू पाहतेयस ते बदनामीच्या उंच शिखराकडे नेणारं आहे...

ती उसळून म्हणाली ,

छान! बायकांनी केला तर व्यभिचार आणि पुरुषांनी केला तर प्यार! ...

ती जे बोलली त्यात चिड होती. पुरुषप्रधान समाजावर तिने हल्ला केला . ती योग्य तेच बोलली. कारण असे संबंध उघडकीस आले की समाज स्त्रीला बदफैली ठरवतो. पुरुषांच्या चुकावर हळूहळू पांघरून घातलं जातं. पण स्त्रीला कधीच माफ केलं जात नाही. तिला कधीच क्षमा नसते .याचा अनुभव माझ्या स्मृतीत जमा होता. मी भुईवरून नजर उचलून तिच्याकडे बघू लागलो. माधुरी वहिनी खाली मान घालून शांत उभी होती . तिचे गाल विचित्र हलले. आकाशात ढग जमा होतात आणि मग अविश्रांत पावसाच्या धारा कोसळू लागतात तसेच तिचे डोळे डबडबले. गालावरून अश्रुपात सुरू झाला. माणुसकी किंवा सहानुभूती म्हणून तिचे अश्रू पुसण्याचा विचार माझ्या मनात आला .पण तसं करणं मला जमलं नाही. मी तिचे अश्रू पुसू शकलो नाही. कारण तिला आशेच्या किरण दिसला असता .कदाचित बेभान होऊन तिने मला मिठी मारली असती . तिला आशेचा किरण दाखविणे म्हणजे माझ्या दृष्टीने धोका होता . तिने मला मिठी मारणे म्हणजे माझ्या दृष्टीने फार मोठा अपघात होता. आणि हा अपघात क्षण दोन क्षणांनी येणाऱ्या भविष्यात घडणार होता . मी धोका पत्करायला तयार झालो नाही. त्या अपघातातून स्वतःला वाचविण्याचा मी पूर्णतः प्रयत्न केला. माधुरी वहिनी मला घट्ट मिठी मारेल अशी मला भीती वाटली. त्या भीती पोटी माझ्यातील माणुसकीचा मी खून केला . मी मजबूर झालो. कित्येकदा माणुसकी दाखविण्याविषयी शहाणपण सांगत फिरलो होतो. पण आता माझी मजबुरी होती. दुसऱ्यांना शहाणपण सांगणं किती सोपं असतं याचा अनुभव मी घेत होतो. मी तिच्या चेहऱ्याकडे तसाच बघत राहिलो. गालावरून घळाघळा अश्रू वाहून मुखसागराच्या खाडीशी त्या अश्रूधारांचं मिलन झालेलं मी पाहिलं. आता अधिक वेळ ती थांबू नये म्हणून म्हणालो ,

वाहिनी निघ तू आता.

माझ्या अश्रूंची किंमत न घेता जाऊ मी ?

वहिनी मला कृपया समजून घे.

तुम्ही मला का समजून घेत नाही?

तिच्यापासून सुटण्याचा मार्ग म्हणून मी म्हटलं,

बरं मी प्रयत्न करेल .आत्ताच मी काही सांगू शकत नाही. मला विचार करण्यास संधी दे.

ठीक आहे . आजच्या गोष्टी तिसऱ्याला माहीत होता कामा नये. मलाही तेच हवं होतं म्हणून मी मानेनेच होकार दिला. तिने हातानेच अश्रूंचे ओघळ पुसून घेतले. आणि आली त्याच दरातून निघून गेली. बाहेर जाण्यासाठी माझ्या घराला दुसरं दार नव्हतं . मी दारात उभा राहून ती गेलेल्या दिशेकडे बघत राहिलो . ती घरात होती तेव्हा तिने लवकर जावं असं मला वाटलं. पण गेल्यानंतर तिने एकदा वळून बघावं असंही वाटलं. ती वळून बघेल असंही वाटलं. पण तिने वळून बघितलं नाही. एक पुरुष म्हणून प्रत्येकाचा स्वभाव असा असतो का? परस्त्री विषयी त्याला अनामिका आकर्षण असतं का? हे प्रश्न खरे तर संशोधनाचा विषय आहेत....घरात अजूनही तिचा दरवळ पसरला होता. ती गेल्यानंतर मला तिने परत बघावं असं का वाटलं? हा अनुत्तरीत प्रश्न घेऊन मी खाटेवर येऊन पडलो . बाहेर उन्हाची रखरख आणखीच वाढत होती. मी नुसता विचार करू लागलो. माधुरी वहिनीला पाहून माझ्या मनात अनामिक ओढ निर्माण झाली होती. तरी संयम ठेवण्यात मी यशस्वी झालो होतो. आज ती माझ्यापुढे सर्वस्व अर्पण करण्यास उभी होती. पण समाजाच्या भितीने का असेना ,तिला टाळण्यात मी यशस्वी झालो होतो. माझ्या डोळ्यापुढे माधुरी वहिनी पुन्हा पुन्हा उभी राहत होती .पुन्हा पुन्हा दिनेश डोळ्यांपुढे उभा राहत होता. मग निशा, तिचे आई बाबा, माझे आई बाबा हे सगळे आळीपाळीने माझ्या डोळ्यांपुढे येत होते. मी गोंधळून गेलो. माधुरी वहिनीशी बोलणार नाही असा मनाशी निश्चय केला. पण तिच्याशी अबोला धरणे कठीण आहे हे लगेच माझ्या लक्षात आलं. कारण दिनेशच्या आई बाबांनी मला न बोलण्याचं कारण विचारलं असतं. मी वहिनीशी का बोलत नाही या प्रश्नाचं उत्तर देणं मला कठीण झालं असतं . मी नुसताच विचार करीत होतो. तिच्या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत होतो. पण मला योग्य उत्तर गवसत नव्हतं. विचार करून करून मन थकलं होतं. विचार चक्रात गुंतून तसाच कितीतरी वेळ पर्यंत खाटेवर पडून राहिलो.

य होईल तितका मी तिला टाळण्याचा प्रयत्न करीत होतो. सुटलो एकदाचा म्हणून मध्येच सुटकेचा श्वासही सोडत होतो. आणि तिला चोरून बघावं असं मला वाटत होतं. सकाळी सकाळी ते आळसावत दारात येईल असंही वाटत होतं . का कुणास ठाऊक ! पण ही कल्पना मला सुखद वाटत होती. अशातच तिच्या सुपीक डोक्याचा नवा अनुभव आला. आता तिने नवाच उपाय शोधून काढला . ती लहान पोरा सोरांच्या हातून मला प्रेम पत्र पाठवू लागली. माधुरी वहिनी इथपर्यंत प्रगती करेल असं मला कधीच वाटलं नव्हतं. तिने माझ्यापुढे नवी समस्या निर्माण केली होती . बदनामीचा उंच शिखर आता अधिक दूर नव्हता. कधी पोरा सोरांच्या हातून तिने पाठविलेले पत्र कुणाच्या हाती लागतील याचा नेम राहिला नव्हता . कोणत्याही क्षणी कुणाच्याही हाती ते पत्र लागू शकत होते. नुसत्या कल्पनेने मनाचा थरका उडत होता. तिच्यापासून सुटण्याचा, मुक्तीचा मार्ग मला दिसत नव्हता. मी निशेच्या प्रेमात गुंतलो होतो. उद्या हा प्रकार निशेला कळाला तर ती मला क्षमा करणार नव्हती. तीच काय कुणी मला क्षमा केली नसती . मी निर्दोष आहे हे सांगण्यासाठी माझ्याकडे एकही ठोस पुरावा नव्हता. एकाच प्रसंगाने अनेक समस्या निर्माण केल्या होत्या.... दुपारची झोप घेऊन चेहऱ्यावरून पाणी घेण्यासाठी पाण्याचा तांब्या घेतला. आणि दारात आलो. माधुरी वहिनी तिच्या दारात उभी होती. मला बघताच ती म्हणाली,

इकडे या.

कशाला ?

पंखा अचानक बिघडलाय, थोडा प्रयत्न करा.

त्याबद्दल मला काहीच कळत नाही.

मी तिच्यापासून सुटण्याचा प्रयत्न करीत आहे हे ओळखून ती थोड्या दबक्या आवाजात म्हणाली,

मी घरी एकटी नाहीये .

आता मला थोडं बरं वाटलं. मनात म्हटलं , सुटलो एकदाचा . ती घरी एकटी नाही म्हणजे किमान दिनेशची आई किंवा त्याचे वडील घरी असणार. आता जायला हरकत नाही, असा विचार केला. पंख्याबद्दल मला फारसा अनुभव नव्हता . पण माझ्या जाण्याने किमान दिनेशच्या आई-वडिलांना बरं वाटेल त्या विचाराने मी जायचं ठरवलं. चेहऱ्यावरून पाणी घेऊन चेहरा हातरुमालानेच कोरडा करीत मी दारात आलो. वहिनी अजूनही दारातच उभी होती . अधिक विचार न करता मी दिनेशच्या दाराकडे वळलो. ती काही न बोलता बाजूला झाली. मी पुढे झाल्यानंतर ती माझ्या मागे चालू लागली . तिच्या खोलीच्या दारात मी क्षणभर थांबलो. तोच तिने संपूर्ण बळ एकवटून मला जोरदार धक्का दिला. मी सरळ बिछान्यावर जाऊन पडलो. जो अपघात मी टाळण्याचा प्रयत्न करीत आलो होतो , तो आता अटळ असल्याच माझ्या लक्षात आलं. त्या अपघाताच्या भयाने अंगावर असंख्य काटे उभे झाले. डोक्यात कुणीतरी जोरदार आघात केल्याप्रमाणे डोकं बधिर झालं. कसाबसा सावरून दाराकडे जायला वळलो. दारात वहिनी उभी होती . तिने दोन्ही हातांनी माझी वाट अडविली होती. आणि माझ्या पावलांची गती एकदम बंद झाली. पंखा दुरुस्त करण्याचा फक्त बाणा होता. मला इथपर्यंत आणण्यासाठी तिने खेळलेली ही खेळी होती . किंवा मला फसवण्यासाठीच तिने तसा बहाना केला होता. आणि फसविण्यात यशस्वी झाली होती हे माझ्या लक्षात आलं होतं. तरी काहीतरी बोलायचं म्हणून मी विचारलं,

पंखा कुठे आहे?

हा काय तुमच्या पुढे उभा आहे .

मी इकडे तिकडे बघत विचारलं ,

कुठे ?

तिकडे काय बघताय .तुमच्या पुढेच आहे .नाही दिसत ?

नाही

कसा दिसेल .कारण पंखा दुसऱ्या खोलीत आहे.

मग चल त्या खोलीत.

त्याची काही गरज नाही .

का ?

कारण पंखा बिघडला नाहीये

पण तू तर...

मी पूर्ण वाक्य करण्यापूर्वीच ती शांतपणे म्हणाली,

तुम्हाला इथपर्यंत आणण्यासाठी मला तसं सांगावं लागलं .

मला आणण्यासाठी ?

होय

कशासाठी ?

माझी प्रकृती बरी नाही हे सांगण्यासाठी.

तुझ्या प्रकृतीला काय झालंय ?

झोप येत नाही.

मग डॉक्टरांकडे जा .

डॉक्टरांकडे ह्या बिमारीचं औषध नाही.

मग मी काय करू ?

औषध द्या.

कमाला आहे वहिनी तुझी! ज्या बिमारीचं औषध डॉक्टरांकडे नाही त्या बिमारीचं औषध माझ्याकडे कसं असेल.

कारण माझ्या बिमारीची लक्षणं विचित्र आहेत. मला सारखी तुमची आठवण येते . झोपेत मला तुम्हीच दिसतात . तुमच्या आठवणीने मला झोप येत नाही .

तिला थांबवत मी म्हटलं,

तुला माझी आठवण का येतेय?

स्वप्नातही तुम्हालाच पाहते म्हणून!

तू स्वप्नात मला का पाहतेस ?

कारण स्वप्नात तुम्हीच दिसताय म्हणून..

पण तू स्वप्नात का पाहतेस?

सांगितलं ना ,तुम्ही स्वप्नात दिसताय म्हणून !

पाहिलेले सगळे स्वप्न सत्य होत नाहीत .म्हणून स्वप्न पाहायचे नाहीत.

मग तुम्ही कशाला येतात माझ्या स्वप्नात?

मी कुठे येतोय तुझ्या स्वप्नात?

ती ठामपणे म्हणाली ,

येता, तुम्हीच येतात माझ्या स्वप्नात!

आहे ठीक आहे .आजपासून स्वप्नात येणार नाही . मी निर्णायक उत्तर देऊन मोकळा होण्याचा प्रयत्न केला .पण इतक्यानं तिचं समाधान झालं नाही. तिचे डोळे मादक झाले होते .तारुण्याची सारी नशा डोळ्यात साठवली होती. ओठ दाताखाली दाबत ती म्हणाली ,

असे कसे येणार नाही! मी स्वप्न पाहायचं थोडीच बंद करणार आहे!

नको करू .तुला वाटेल तसं कर .

मी तिच्या प्रश्नोत्तरांनी वैतागून गेलो. आतापर्यंत ती जे प्रश्न करीत होती आणि मी जी उत्तरं देत होतो ती सगळीच एका मूर्खानं द्यावीत तशी होती . माझी मलाच चिड आली. मी अधिक बोलत न बसता तिथून सटकायचं ठरवलं. निघण्यास पाय पुढे टाकणार तेवढ्यात ती म्हणाली ,

राग आलाय माझा?

होय .

दोन पावले सरकून म्हणाली ,

मग मारा मला.

तुला मारण्याचा मला अधिकार मला नाही .

मी नाराजी व्यक्त करीत बोललो.

तुम्हाला अधिकार आहे. तो अधिकार मी स्वतः बहाल करते आहे.

हा अधिकार मला बहाल करण्याचं कारण ?

माझ्यावर डोळा मिचकावत म्हणाली,

मला प्रेम रोग झालाय. आणि मी तुमच्या शिवाय विचार करू शकत नाही .आता सांगा मला मारण्याचा तुम्हाला अधिकार नाही ?माधुरी वहिनी निलाजरेपणे बोलली. तिची ही अदा मला अजिबात पसंत पडली नाही. तिने माझ्यावर डोळा मीचकावला हे तर अजिबातच आवडलं नाही. आजपर्यंत माझ्यावर कोणत्याही पोरीने डोळा मिसकावला नव्हता. मी निशेच्या प्रेमात पडलो पण डोळा मिचकावून आमच्या प्रेमाची सुरुवात झाली नव्हती. कॉलेजच्या आवारात गुलमोराच्या झाडाखाली निशा मैत्रिणींसह बसली असायची. शंभर दीडशे फुटावर रेतीच्या ढिगावर मी पाय पसरून बसायचो. आम्ही दोघेही एकमेकांकडे बघून खाली मान घालायचो. एकदा धाडस करून मी निशेला नोटबुक मागायला गेलो. तिने नोटबुक दिला त्या नोटबुकच्या पहिल्या पानावर, ' तू मला फार आवडतेस.' असं लिहून तो तिला परत केला. मग निशेने माझा नोटबुक मागून , 'तुम्ही सुद्धा मला फार आवडतात.' असं लिहून तो मला परत केला .आणि आमच्या प्रेमाची सुरुवात झाली होती. पण माधुरी वहिनीची प्रेमात पडण्याची पद्धत मला भयंकर आधुनिक वाटली . मी म्हणालो,

वाहिनी मला कृपया जाऊ दे .

अवश्य पण तुम्ही काहीहीच कसं सांगितलं नाही.

म्हणजे? मी कामचलाऊ प्रश्न केला.

अहो, म्हणजे म्हणजे काय! विचार करणार होतात ना तुम्ही?

मी काहीसा गोंधळून म्हणालो, हं हा हो ! पण मला आणखी विचार करू दे.

त्यासाठी इतका विचार कशाला करायला हवा. मला तुमची बायको करून घ्या असं कुठे म्हणते आहे मी!

वहिनी प्लीज, प्लीज असे शब्द तुमच्या तोंडी सोभत नाहीत.

शोभेसाठी मी काही बोलत नाही. तुमचा चेहरा पाहण्यासाठी मी किती तळमळते!

जे मिळू शकत नाही त्यासाठी ही तळमळ चांगली नाही, वहिनी. ते मलाही माहित आहे. तुम्ही मला टाळण्याचा प्रयत्न करतात तेही मला कळतं.

बोलता बोलता तिचा आवाज घोगरा झाला. रडवेला झाला. माधुरी वहिनीची मला दया आली .पण ती माझ्याकडून जी अपेक्षा करीत होती ती अपेक्षा मी पूर्ण करू शकत नव्हतो. मी म्हटलं, वहिनी आतापर्यंत आपल्या जे काही झालं ते तिसऱ्याला कळणार नाही. माझा निर्णय तुझ्या बाजूने असेल किंवा नाही याची मला खात्री देता येणार नाही. म्हणून तू माझा विचार सोड. दिनेश ची काही मजबुरी असेल. तो निश्चित चांगला आहे.. काय मजबुरी असेल?

असेल कोणतीतरी मजबुरी. कारण त्याच्या आजारपणापासूनच तो असा वागायला लागलाय. तू त्याला समजून घे.

मी समजून घेण्याचा खूप प्रयत्न केलाय. आज त्यांच्या आजारापासून जवळपास दोन महिने झालेत ,मला नुसता टाळण्याचा प्रयत्न करतायत ते. त्यांनी स्वतःची मजबुरी तरी सांगायला हवी ना ?

नसेल कदाचित सांगण्यासारखी. पण तडजोड केल्याशिवाय वैवाहिक जीवन यशस्वी होत नाही. उद्या तुझ्या जीवनात सुखाचा बहर येईल.

उपाशी माणसाला वेळेवर अन्न मिळालं नाही तर तो मरेल. मग त्याच्या प्रेतावर अन्नाचा कितीही मोठा ढीग ठेवला तरी त्याचा काही उपयोग होणार नाही.

वहिनीच्या बोलण्यात तत्विक आधार होता. मी वाद घालत बसलो असतो तर ती जिंकली असती .आता तिला समजावण्याचा माझा प्रयत्न असफल ठरत असल्याचं माझ्या लक्षात आलं. ती लैंगिक भूकेविषयी बोलत होती. लैंगिक भूक अन्नाच्या भुकेइतकीच महत्वाची आहे, हे माझ्या वाचनातून गेल्याच मला आठवलं. पण ह्या पाककृतीत विचारांचं इथे समर्थन करणं मला परवडण्यासारखं नव्हतं. मी म्हणालो,

वहिनी, तू म्हणतेस ते खरे असेल कदाचित .पण आपण अशाप्रकारे वागून दिनेशच्या विश्वासाचा, त्याच्या भावनांचा खून करतो असं नाही वाटत तुला!

माझ्या ज्ञानदानाकडे दुर्लक्ष करून ती म्हणाली,

उपाशी माणसाची भूक भागवावी हाच खरा न्याय आहे .

तुझी भूक भागवणे हा तुला न्याय वाटेल वहिनी. पण दिनेशवर अन्याय होईल .मी त्याच्यावर अन्याय करणार नाही .आता मला रजा दे .

असं म्हणून मी झटकन जाण्यास पुढे पाऊल टाकलं .पण आता तिने आक्रमक पवित्रा घेतला. तिने मला मिठी मारली . अगदी घट्ट मिठी मारली. तिला ढकलून स्वतःचा तोल सांभाळत म्हणालो,

संयम ठेवायला शिक, वहिनी. माणसाला विचार करण्यासाठी मन मिळालं आहे. माणसात आणि जनावरात हाच एक महत्त्वाचा फरक आहे.

पण मी केलेलं ज्ञानदान बेअसर झाल्याचं माझ्या लक्षात आलं. कारण तिने पुन्हा मला कडकडून मिठी मारली . तिच्या मगर मिठीतून माझी सुटका करून घेता येणं कठीण आहे हे पूर्ण माझ्या लक्षात आलं . आणि त्या मिठीतून सुटण्याची माझी धडपड शांत होत गेली. नको त्या ठिकाणी माधुरी वहिनी चुंबनांचा वर्षाव करीत होती. तिच्या कांद्यावर मान टाकून मी तसाच उभा राहिलो . चार-पाच मिनिटे हा प्रकार सुरू राहिला. अचानक मग माझं लक्ष एका मानवी छायाकडे गेलं. दारातून खोलीत ती सावली शांत पडली होती. ती पाहताच माझ्या काळजाचे हजारो लाखो तुकडे झाले . कुणीतरी कसाईवृत्तीने माझ्या काळजाला त्या सावलीच्या रूपाने टर टर फाडत होता. हिम्मत करून त्या सावलीच्या दिशेकडे बघितलं. आणि आणखीच गोंधळून गेललो. कारण ती सावली दिनेश ची होती. तो शांतपणे स्वतःच्या अब्रूचा तमाशा बघत होता. बोलण्यासाठी माझ्याकडे शब्दच उरले नव्हते. पण काहीतरी बोलणं आवश्यकच होतं. कारण नुसताच अपराधी पणे मान घालून राहण्याची ती वेळ नव्हती .आणि अपराधी पणे पळूनही जाता येत नव्हतं. त्याच्या माझ्या मूक पणाला वाचा फोडायचीच होती. म्हणून मी माझी लाज लज्जा विसरून अगदी खालच्या आवाजात

दिनेश मला क्षमा कर. इतकच म्हणू शकलो. जितक्या सहजतेनं हे बोललो तितक्याच सहजतेनं तो मला क्षमा करेल असं मला वाटलंही नव्हतं. पण दिनेश शांत आवाजात म्हणाला,

हा तुझा दोष नाही. विस्तवाजवळ तूप वितळणारच .मी नुसत्या डोळ्यांच्या पापण्या वर करून त्याच्याकडे पाहिलं. क्षणातच पापण्या डोळ्यावर अंथरून घेतल्या .माधुरी वहिनी म्हणजे विस्तव नाही. आणि त्या विस्तवाने वितळणारा मी तूप नाही असं त्याला ओरडून सांगावसं वाटलं. पण दिनेशच्या शब्दांची व माझ्या शब्दाची झुंज करून वादळ उठविण्यात अर्थ नाही, ह्या विचाराने मी घरी परतलो.

संपूर्ण दिवस मी त्याच विचारात होतो. अनेक विचार मनात येऊन जाऊ लागेल .माधुरी वहिनीचं काय होईल ह्या विचारातच सूर्य पश्चिमेला लपून गेला. कशातच माझं मन लागेना. रात्री बऱ्याच वेळ पर्यंत मी अंथरुणावर खिळून राहिलो. कितीतरी वेळ इकडे तिकडे कड बदलविणेच माझ्या हातात होतं. सारे प्रसंग डोळ्यांपुढे गर्दी करून उभे होते. विशेषता दिनेशचे शब्द मला बेचैन करून सोडत होते. रात्र बरीच झाली होती. बाहेर काळाकभिन्न अंधार होता. दिवसभर झोपेचं सोंग घेऊन असलेले रातकिडे आता सामूहिक किरकिराट करत होते. त्यामुळे बाहेर जाण्याची सोय उरली नव्हती. जवळपास साडेअकराचा सुमार झाल्याने हॉटेल बंद झाले होते. लाईट विझवून आई आणि बाबा ही निद्रेच्या कुशीत पडले होते. दिनेशच्या खिडकीचा पडदा अधून मधून सळसळत होता. त्यातून नाईट लॅम्पचा अंधुक प्रकाश अंगणात येत होता. दिनेशने झालेल्या प्रकाराबद्दल कुणालाही सांगितलं नाही म्हणून मनात दिनेशचे आभार मानत होतो. पण भीतीपूर्ती संपली नव्हती. उद्या तो काय पावलं उचलणार. मला काय बोलणार. या विचारांनी मी बेचैन होऊ लागलो. मनात अनेक विचार येऊ लागले .त्याचवेळी दिनेशची विल्हेवाट लावली असती तर बरं झालं असतं. आणि ते काम देखील सुलभ होण्यास माधुरी वहिनीने मला निश्चित मदत केली असती. कारण बदनामीपासून वाचण्यासाठी तो एकमेव उपाय होता. पुन्हा दिनेशच्या खिडकीकडे लक्ष गेलं .वाऱ्याच्या एका जोरदार झुळकीने पडदा सडसडला. विचार करता करता बारा वाजत आले .

दिनेशचा खून करण्यासाठी माझ्या मनात विचार येऊ लागला. आणि मी त्यात सिद्धतेने योजना आखो लागलो. खून करण्याकरिता त्याच्या गळ्यात मजबूत दोरी घालून आवरण्याचा विचार करू लागलो. पण ही कल्पना मागे पाडली दिनेश काही लहान सहान प्राणी नाही. तो इतक्या सहजतेनं मला पेलणार नव्हता. एक नवी कल्पना सुचली सपासप चाकूने वार करण्याचा विचार पक्का झाला. एकदा त्याच्या खिडकीकडे पाहिल. त्याच खिडकीतून मी त्याच्या खोलीत प्रवेश करणार होतो .कित्येक दिवसांपासून मी एक चाकू घेऊन ठेवला होता. तशी त्या शास्त्राची खरेदी करताना मला कुठलीच गरज नव्हती. परंतु किफायत भावात मिळाला होता म्हणून घेऊन ठेवला होता. आता त्याच चाकूचं महत्त्व वाढलं होतं. पूर्वी ते चाकू खरेदी करून बिनकामाची वस्तू विकत घेतली म्हणून मी कित्येकदा पश्चाताप केला होता. मात्र त्यावेळी बिनकामाची वस्तु ठरलेलं ते शस्त्र प्रचंड मोलाचं वाटलं. मी लाईट न लावता अंधारातच उठलो. अंथरुणातून बाहेर पडल्यावर खाटेशी क्षणभर उभा राहिलो. आई आणि बाबा गाढ झोपेत असल्याची एकदा खात्री करून घेतली. मग चाकू ठेवलेल्या पेटीकडे चालू लागलो. पहिलंच पाऊल पुढे टाकलं तशी पायाची ठोकर लागल्याने खाली ठेवलेला रिकामा ग्लास घरंगळत दूर जाऊन पडला. त्या आवाजाने बाबांची झोप जागी झाली. बाबा हाड हाड म्हणत उठला . तो आवाज ऐकून आई सुद्धा उठून बसली. मी म्हटलं ,'कुत्रा मी नव्हे' मग बाबांनी विचारलं, बापा बापू निजलास नाही का?

झोपच येत नाही. का?आई नसल येत .दिवसभर झोपते नं आता बाबांनी असं म्हटल्यावर आई गप्पच राहिली. आईने लाईट लावला. दूर पडलेला ग्लास उचलून माझ्या खाटेजवळ तांब्या भरुन पाणी ठेवलं होतं. त्यातील पाणी काढून घटाघटा प्याली. आणि तांब्याला लागूनच ग्लास उपडा ठेवला. व अंथरुणात पडली. मी लघुशांतीचं सोंग घेऊन बाहेर आलो . पुन्हा जाऊन अंथरुणावर पडलो .बाबांनी विडी पेटविली आणि,'बापू नीज आता.' असी सूचना देऊन बाबांनी लाईट बंद केला. मी खाटेवर उताना पडलो. पडलो. नव्हे अंग टाकलं .अर्थात बाबा आणि आई गाढ झोपेपर्यंत मला प्रतीक्षा करावी लागणार होती. बाबांनी जोरदार दम मारला की अंधारात तोंडातील विडी मिलमिल करीत होती. केव्हा एकदा विडी विझवून बाबा झोपी जातात असं सारखं वाटत होतं. शेवटी पाच-सहा मिनिटात धूम्रपणाचं प्रदूषण कमी झालं. आई बाबा झोपी गेल्यानंतर अंदाजे एक तासाने माझ्या कार्याला सुरुवात करणार होतो. अंथरुणात पडल्या पडल्याच मी दिनेशच्या खिडकीकडे बघितलं . याच खिडकीतून दिनेशचा जीव जाणार होता . खिडकीकडे बघून क्षणभर डोळे मिटले. तेव्हा निद्रा सुखाचा मोह मला आवरेनासा झाला. अद्याप एक तास पर्यंत वाट बघायचीच होती म्हणून डोळ्यांची उघडझाप करू लागलो. एक एक क्षण भारी जाऊ लागला . डोळ्यांची उघडझाप करण्यातच पेंग येऊ लागला. निश्चित किती वाजले होते ते कळलं नाही....

सकाळचे आठ वाजले असतील तोपर्यंत मी अंथरुणातून बाहेर पडलो नाही .आई व बाबांनी मला ,बापू उठ म्हणून गदगदा हलवून उठवलं. उठून डोळे चोळतच आहे, तर दिनेशने आत्महत्या केल्याची बातमी तीर्थरूपाणी सांगितली . भय आणि आश्चर्याने मी त्यांच्याकडे बघू लागलो. दिनेशला संपवायचं मी ठरवून होतो. पण त्याने स्वतःच मृत्यूला मिठी मारली. मी मात्र त्याला संपवण्याच्या कल्पनेतच झोपी गेलो होतो. बाहेर अंगणात व दिनेशच्या घरात प्रचंड गर्दी उसळली होती. त्याच्या मृत्यू विषयी बरेच लोक हळहळत होते. काही आत्महत्या केली म्हणून दिनेशला मूर्ख म्हणत होते. लोकांच्या गर्दीतून मी सरळ दिनेशच्या खोलीत गेलो. त्याच्या प्रेतावर डोकं ठेवून माधुरी वहिनी मोठ्याने रडत होती. त्याचे आई बाबा मला बिलगुन रडू लागले. काल त्याची हत्या करायला सिद्ध असलेला मी आज त्याच्या मृत्यूवर अश्रू ढाळू लागलो. माझं लक्ष टेबलाकडे गेलं. त्यावर एक कागद सळसळताना दिसला. कागदावर पेन ठेवला होता. मजकुराच्या वर मृत्युपत्र असा शीर्षक दिसला मी तो वाचू लागलो.

'मी माझी जीवनयात्रा स्वतः संपवत आहे .कारण मला टीबी (क्षय) हा आजार झालेला आहे.ह्या आजारातून मुक्ती असेल किंवा नसेल पण स्त्री संग टाळण्याचा डॉक्टरांनी तात्पुरता सल्ला दिला . त्यामुळे माधुरीवर अन्याय होईल .कुठलेही कारण नसताना माधुरीला घटस्फोट देणे म्हणजे साधी बाब नव्हती. तिची शारीरिक भूक भागविण्यास मी समर्थ ठरलो. त्यासाठी माधुरीने मला क्षमा करावी. मला क्षय झाल्याचं कोणालाही मी सांगितलं नव्हतं. असो ...माझ्या मृत्यूस कुणालाही जबाबदार धरू नये. मी पूर्ण होशात व समजून हे पाऊल उचललं आहे .

दिनेश जाधव

मृत्युपत्र वाचल्यानंतर मला भरून आलं. नकळत डोळ्यातील पाऊस पापण्यांच्या काठांनी वाहू लागला. दिनेशने जे बघितलं ते शेवटच्या क्षणी ही कुणाला कळू दिलं नाही. शेवटी प्रेतयात्रा संपली .....

दुसऱ्या दिवशी नातेवाईक व पंच एकत्र येऊन सभा घेण्यात आली .त्यात माधुरी वहिनींचं कोवळं होईल लक्षात घेऊन तिने कुणाकडे राहायचं असा सवाल करण्यात आला आणि त्याचे उत्तरही पंच कमिटीनेच दिलं त्यानुसार माधुरीने आता माहेरीच राहावं असा निर्णय दिला. तो निर्णय माधुरीने नाकारण्याचं किंवा दिनेशच्या आई-बाबांनी नाकारण्याचं कारण नव्हतं. निर्णयाप्रमाणे माधुरीने ताबडतोब जायची तयारी केली.ती जाताना मला भेटायला आली. झालेल्या प्रकाराबद्दल तिनेक क्षमा मागितली. काय बोलावं ते मला समजत नव्हतं .मी मूकपणे तिच्याकडे बघत होतो. निरोपाच्या निमित्ताने असेल कदाचित तिच्या डोळ्यांनी अश्रू ढाळले. त्या प्रत्येक थेंबात मला दिनेशचा चेहरा दिसला. तो प्रसन्न होता. टवटवीत होता. ह्याउलट माधुरीने घातलेली साडी परीघडीची होती. पण कोमेजलेल्या गुलाबावर अमृत शिंपडून त्यात टवटवी भरता येत नाही ,तशी ती त्या साडीत दिसत होती.माझ्या पाहण्यात माधुरी प्रथमच मला निस्तेज दिसली .आणि स्मरण्यातही दिनेश तेज वाटत होता.

बरे येते मी ...

माधुरीच्या अखेरच्या आवाजाने त्या आवाजातील रडविलेपणाने मी कल्पनेच्या जगातून परतलो. माझ्या प्रतिसादाची प्रतीक्षा न करताच ती निघून जाऊ लागली . आज प्रथमच माझ्या बोलण्याची वाट न बघता ती जाऊ लागली यावर माझा चटकन विश्वास बसला नाही. माझ्यासाठी काल किती तडफडली होती ती! आज साधी नजर भेटही झाली नव्हती. मग मलाच वाटलं, आज अबोल झालीस का? असं विचारावं तिला. पण हा प्रश्न मी मनातच ठेवला. मी तिच्याआकृतीकडे नुसताच बघत राहिलो. अगदी दृष्टी आड होईपर्यंत!

आता मी निशेच्या कुशीत असतो . तेव्हा तिच्या गळ्यातील मंगळसूत्र माझ्य कपोल मैदानावर स्पर्श खेळ खेळत असतो. निशा मला घट्ट मिठी मारते. अशावेळी मला बऱ्याचदा माधुरी वहिनी आठवते. तो गरम श्वास आठवतो. तिची प्रत्येक आठवण मनाला येऊन घट्ट मिठी मारते. आणि दिनेशही आठवतो . नव्हे, तो तर अजूनही जिवंत आहे माझ्या मनात! मी मनातच त्याच्याशी बोलतो. म्हणतो, दिनेश यु आर ग्रेट! आणि माधुरीला शेवटचा प्रश्न विचारायचा राहून गेला होता. तो प्रश्नही पुन्हा आठवतो, आज अबोल झालीस का?.... कारण आता ती खरेच कधीही बोलणार नव्हती.......

राजू बोरकर
मु.पो. ता. लाखांदूर
जि. भंडारा
७५०७०२५४६७

## नगरोउत्थान योजने अंतर्गत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते हनुमान मंदिर रस्ते व नालीच्या बांधकामाचे उद्घाटन संपन्न



केज/प्रतिनिधी–नगरोउत्थान योजने अंतर्गत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जुन्या केज शहरातील मुख्य रस्ता हा हनुमान मंदिर पर्यंत रस्ते व नालीच्या कामाचे उद्घाटन जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून हा रस्ता प्रभाग क्रमांक १२,१३,१४आणि १५ या प्रभागातील जुन्या केज शहरातील मुख्य रस्ता मानला जात आहे. या रस्त्याने शहरातील सर्व समाज बांधवांचे महत्वाचे सण–उत्सव साजरे करून मिरवणूक काढली जात आहे सदर रस्ता हा गत अनेक वर्षापासून खराब झालेला होता. या रस्त्याचे व नालीचे बांधकाम हे नगरोउत्थान योजनेअंतर्गत ७६ हजार कोटी रुपयांच्या उर्वरित बजेट मधून प्रोच रोड करण्यात येत आहे असे माध्यमाशी बोलताना हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी सांगितले आहे. यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेवक खैसरभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, जनविकास परिवर्तन आघाडीचे युवा नेते लखन हजारे, नगरसेविका पती युनुसभाई शेख, मजर शेख, गफार बागवान, आसिफ इनामदार यांच्यासह जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व या भागातील नागरिक उपस्थित होते.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात ग्रंथवाचन, उत्स्फुर्त भाषण, काव्यवाचन, व्याख्यान, परिसंवाद , चर्चासत्र संपन्न .




केज/प्रतिनिधी–स्वानंद सर्वजनिक वाचनालय, आनंदगाव ता. केज. जि. बीड येथे दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी ग्रंथवाचन, उत्स्पुर्त भाषण, काव्यवाचन, व्याख्यान, परिसंवाद, चर्चासत्र हे वाचन संकल्प महाराष्ट्रा चा अंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव (बप्पा) गायकवाड हे होते. या विविध कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. शिवम गायकवाड, रोहन गायकवाड, स्वप्नील गायकवाड, कृष्णराजे गायकवाड, विक्रम गायकवाड, अथर्व गायकवाड, प्रथमेश गायकवाड, चांचासह मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होते. वाचन कक्षात ग्रंथप्रदर्शनही झाली. तसेच सेवानिवृत्त ग्रामसेवक एस. पी. गायकुवाड, रापसाहेब जाधव, रंजीत पाटील, रामराजे गायकवाड, दत्तात्रय कदम, संजय सोनवणे, नारायण गायकवाड,आरुण गायकवाड, आनंद( भैय्या) गायकवाड यांचाही सहभाग होता. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत ग्रंथवाचन, काव्य वाचन, उत्स्फुर्त भाषण, परिसंवाद, चर्चासत्र कार्यक्रमात भाग घेतला. तसेच विद्यार्थ्यांचेच थोडक्यात व्याख्याने झाली. अध्याक्षीय समारोप वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुगसंचलन, आभार प्रदर्शन आनंद( भेय्या) गायकवाड यांनी केले.

## ब्रह्मकुमारी शिवानी दिदींचे उदगीर येथे प्रेरणादायी व्याख्यान चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी केले स्वागत

लातूर / प्रतिनिधी :– प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय संस्थेच्या प्रसिद्ध वक्ते ब्रह्मकुमारी शिवानी दिदींचे प्रेरणादायी व्याख्यान उदगीर येथील जि.प. मैदान तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली होती. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहून ब्रह्मकुमारी शिवानी दिदींचे स्वागत केले. या प्रसंगी ब्रह्मकुमारी शिवानी दिदी यांनी आपल्या व्याख्यानात जीवन मूल्यांचे महत्त्व, आध्यात्मिक जागृती आणि आत्मिक शांती या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांनी उपस्थितांना सकारात्मक विचारांचे महत्त्व सांगितले आणि जीवनातील समस्यांना सामोरे जाण्याची शक्ती कशी वाढवायची याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय संस्थेच्या ब्रह्मकुमारी शिवानी दिदी यांची विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी भेट घेऊन लातूर शहर आणि परीसरातील नागरीकांना आपले मार्गदर्शन ऐकता यावे यासाठी आपला वेळ दयावी अशी विनंती केली.

## देशमुख हत्याकांड: खा.सोनवणेंच्या पाठपुराव्याने मानव अधिकार आयोगात गुन्हा दाखल

केज/प्रतिनिधी–मस्सोजागचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून आणि त्यांच्या देहाची केलेली विटंबना माणूसकीला काळीमा फासणारी घटना असून या प्रकरणी खा.बजरंग सोनवणे यांनी दि.३ जानेवारी रोजी याप्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकारी आयोगाने स्वतंत्रपणे चौकशी करावी, अशी मागणी आयोगाचे सदस्य प्रियांक क्रानूगनो यांची भेट घेऊन केली होती. या प्रकरणात आयोगाने गुन्हा दाखल करून घेतला असून आता आयोगही स्वतंत्र चौकशी करणार आहे. दि.९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे समजल्यानंतर सर्वात पहिल्यांदा संतोष देशमुख यांचा जीव वाचावा, यासाठी खा.सोनवणे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क केला. दरम्यान, त्यांनी फोन घेणे टाळले. शिवाय केज पोलीसांनी देखील हे प्रकरण गांभिर्याने घेतले नाही. या कालावधीत संतोष देशमुख यांचा मानसिक व शारीरिक छळ करुन हत्या झाली. संतोष देशमुख यांना इतक्या वाईटपध्दतीने मारहाण केली की शरिरावर एक इंच देखील जागा शिल्लक नव्हती. शिवाय शवाची विटंबना देखील करण्यात आली. इतक्या अमानुषपध्दतीने मारहाण झाल्याच्या घटनेने राज्यात खळबळ उडालेली आहे. या प्रकरणी, दि.३ जानेवारी रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली येथे आयुक्तांची भेट घेऊन मस्साजोग येथील घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. स्व.संतोष देशमुख कुटुंबियांना मदत मिळऊन देणे बाबत आयोगाला विनंती केली. दि.९ डिसेंबर रोजी मस्साजोग सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना अत्यंत अमानवी आहे. यात मानव अधिकाराचे उल्लंघन झाले असल्यामुळे या प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दखल घ्यावी, अशी आग्रहाची विनंती केली होती. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने खासदारांची विनंती मान्य करुन मस्साजोग प्रकरणात गुन्हा क्र.३३/१३/५/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करुन घेतला आहे. आता या गुन्ह्यामधील तपास, पोलिस आणि न्यायव्यवस्था यावर राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांचे सुद्धा लक्ष असेल. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग जिल्ह्यामध्ये तातडीने टीम पाठवून कारवाई करणार आहे. शिवाय या संपूर्ण घटनेचा अहवाल मागवणार असून ही टीम दिल्ली येथील असेल.घटनेच्या वेळी अथवा तपासामधे पोलिसांचे दुर्लक्ष झाले असल्यास राष्ट्रीय मानवाधिकार आयोग तसा अहवाल देते व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला याबाबत कारवाई करण्याचे अधिकार आहेत. आयोगाला न्यायिक व अर्धन्यायिक अधिकार आहेत. गुन्हा नोंद करुन घेऊन प्रकरणात गांभिर्याने कारवाई केल्याबद्दल खा.बजरंग सोनवणे यांनी देशाच्या महामहिम राष्ट्रपती व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे आभार मानले आहेत.

### मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाचे थाटात उदघाटन

## मानवी जीवनात सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही : बाबासाहेब पाटील




लातूर : शिक्षणाने मनुष्य ज्ञानी, विचारी, प्रगल्भ होतो. सर्वच क्षेत्रात तो नावलौकीक संपादित करू शकतो. त्यामुळे मानवी जीवनात सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी बाबासाहेब पाटील बोलत होते.हे शैक्षणिक संमेलन औसा रोडवरील थोरमोटे लॉन्स, लातूर येथे लोकनेते विलासराव देशमुख नगरीत पार पडत आहे. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी शालेय शिक्षण मंत्री वसंत पुरके, शिक्षक आमदार विक्रम काळे, संमेलनाध्यक्ष बाबुराव जाधव, कार्याध्यक्ष हनुमंत शेषेराव साखरे, शिक्षणाधिकारी ( योजना ) तृप्ती अंधारे, मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून संमेलनाचे उदघाटन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते संमेलनाच्या अनुषंगाने काढण्यात आलेल्या ' ज्ञानतीर्थ ' स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. संयोजकांच्या वतीने प्रारंभी सर्व प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाच्या आयोजनाचा बहुमान शैक्षणिक पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूरला दिल्याबद्दल, लातूरचा सुपुत्र या नात्याने आपण संयोजकांचे आभार मानतो, असे सांगितले. परिवर्तन हा निसर्गाचा, प्रकृतीचा नियम आहे, असे म्हटले जाते. आज शिक्षण क्षेत्रातही अमुलाग्र परिवर्तन होताना दिसत आहे. यामागे शिक्षण क्षेत्रात अनमोल योगदान देणाऱ्या शिक्षकवृंदांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळेच आजमितीस जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांतूनही अनेक डॉक्टर, इंजिनिअर, यशस्वी उद्योगजक घडताना दिसत आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या माध्यमातूनही अतिशय चांगले शिक्षण देण्यात येत आहे, ही बाब अत्यंत महत्वाची आहे. यापुढील काळातही विद्यार्थी मोठ्या संख्येने जिल्हा परिषद शाळांकडे वळले पाहिजेत. आजघडीला शिक्षणासाठीचा खर्च खूप वाढला आहे. शिक्षणासाठी होणार हा खर्च न मानता त्याकडे आयुष्यातील महत्वपूर्ण गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनीही शिक्षण घेताना तासिका टाळण्याचा प्रयत्न न करता प्रत्येक विषयाच्या सर्व तासिकांना हजेरी ल;लावून आपल्या गुरुजनांकडून परिपूर्ण ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जीवनात यशस्वी झाल्यानंतर प्रत्येकाने अत्यंत गौरवाने आपण ज्या शाळेत – महाविद्यालयात शिक्षण घेतले, त्याचा उल्लेख अभिमानाने केला पाहिजे, असेही पाटील यांनी सांगितले. या संमेलनाच्या निमित्ताने लातुरात आलेल्या सर्व मान्यवर मुख्याध्यापक मंडळींचेही त्यांनी यावेळी आभार मानले. स्वागताध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी बोलताना अशा प्रकारच्या संमेलनाचे आयोजन वेळोवेळी होणे शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रासाठी अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे एकीकरण होऊन विचारांची देवाण घेवाण होते, प्रत्येकाला काही ना काही नवीन शिकायला मिळते,असे सांगितले. माणूस हा मुळात जिज्ञासू वृत्तीचा आहे. त्याला नेहमी नवनवीन शिकण्याची आवड आहे. अशी संमेलने वारंवार होणे ही काळाची गरज आहे. शिक्षण हे कधीच संपत नसते. माणूस कायम विद्यार्थी म्हणूनच वावरत असतो. ज्ञानाच्या कक्षा दिवसेंदिवस रुंदावत चाललेल्या आहेत. जेवढे ज्ञान आपण संपादन करू,त्याचा उपयोग निश्चितच स्वतःला आणि समाजाला योग्य प्रकारे होईल असे पाहणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक योजना राबविल्या जातात. त्यामध्ये आता विद्यार्थ्यांचा लाडका शिक्षक आणि शिक्षकांचा लाडका विद्यार्थी अशी अभिनव योजना काढायला हवी, असे मतही त्यांनी व्यक्त केले. माजी शालेय शिक्षण मंत्री वसंतराव पुरके यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षण हे सर्वांगीण प्रगती, विकासाचे माध्यम असल्याचे सांगितले. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. गुणवत्ता सार्वभौम होण्यासाठी सर्वांनी कात्रीत येणे गरजेचे आहे. शैक्षणिक संस्थांना योग्य पद्धतीने अनुदान दिले गेल्यास संस्थांची कार्यपद्धती सुधारून चांगले, दर्जेदार शिक्षण देणाऱ्या सुंदर शाळा सुरु होऊ शकतात. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे ध्येय ठरवून पुढे जाणाऱ्या शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून सर्वांना न्याय देणे शक्य व्हावे,अशी अपेक्षाही पुरके यांनी व्यक्त केली. शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना मुख्याध्यापक हा आपल्या शाळा – विद्यालयाच्या कॅप्टनची भूमिका निभावणारा जबाबदार व्यक्ती असतो, असे सांगितले. मात्र, या कॅप्टनची अवस्था सध्या संस्थाचालक आणि प्रशासनरूपी अडकित्यात अडकलेल्या सुपारीसारखी झाली आहे. शिक्षक समाज निर्मितीत महत्वाची भूमिका बजावत असतो. वैद्यकीय क्षेत्रातील एखादा डॉक्टर चुकला तर रुग्णाचा जीव दगावतो. पण विद्यार्थी चुकला तर शिक्षक – मुख्याध्यापक त्याला बरोबर करून तो जीवनात यशस्वी कसा होईल याची शिकवण देतात. आपण वेळोवेळी विविध विधिमंडळ अधिवेशनाच्या माध्यमातून जुन्या पेन्शन योजनेचा विषय लावून धरला आहे. निवडणूक आचारसंहितेमुळे तो विषय मागे पडला आहे. मुख्याध्यापकांनी चिंतन– मनन करून आपल्या विद्यार्थ्यांना चांगल्यात चांगले शिक्षण द्यावे, पटसंख्या वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे,असे आवाहनही आ. काळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देशमुख यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या संमेलनाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी विशद केली. स्वतःबरोबर विद्यार्थ्यांचीही गुणवत्ता वाढवली पाहिजे.संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाच्या लातूर पॅटर्नचा गवगवा आहे. हा पॅटर्न राज्यभरातील मुख्याध्यापकांनाही पाहता – अनुभवता यावा या उद्देशाने सदर संमेलन लातुरात घेण्यात येत असल्याचे देशमुख यांनी सांगितले. या राज्यस्तरीय संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संयुक्त अध्यक्ष रावसाहेब आवारी, वसंतराव पाटील,अध्यक्ष के.एस. डोमसे , कार्याध्यक्ष मोहन सोनवणे , राज्य उपाध्यक्ष नंदकुमार बारवकर, शत्रुघ्न बिरकड, अशोक मोरे, मराठवाडा अध्यक्ष संजय शिप्परकर , उपाध्यक्ष देविदास उमाटे, कांचन महाजन, नामदेव सोनवणे, सचिव जालिंदर पैठणे, विदर्भ अध्यक्ष सतीश जगताप, उपाध्यक्ष मंदा उमाटे, विनोद संगीतराव, सचिव विलास भारसाकळे, सचिव बजरंग चोले , कोषाध्यक्ष शिवराज म्हेत्रे, प्रवक्ते कालिदास शेळके, उपाध्यक्ष रमेश मदरसे, सचिन साबणे, उमेश पाटील, श्रीमती जयश्री ढवळे , मार्गदर्शक दिलीप धुमाळ, धनराज चिद्रे , सुवर्णा जाधव, दत्तात्रय पारवे ,अनिल कारभारी, रामेश्वर कदम, बालाजी मुंडे, एस.व्ही. मादलापूरे, परवेजखान पठाण, विशाल पात्रे , जयश्री पाटील आदी परिश्रम घेत आहेत.

## विद्यार्थी केंद्रबिंदू मानून ज्ञानदानाचे कार्य करावे आ. विक्रम काळे यांचे शिक्षकांना आवाहन



लातूर : आजचे विद्यार्थी हे देशाचे उद्याचे भविष्य आहेत. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून देशाला बलशाली बनवावे, असे आवाहन शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी केले. अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्यावतीने लातूर येथे आयोजित मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय दोन दिवशीय शैक्षणिक संमेलनानिमित्त क्रीडा संकुल येथून लोकनेते विलासराव देशमुख नगरी, थोरमोटे लॉन्स, औसा रोड, लातूर या संमेलनस्थळापर्यंत शुक्रवारी सकाळी शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून आ. काळे बोलत होते. शोभायात्रेत शहरातील विविध शाळांमधील लेझीम पथक व स्काऊट व गाईडच्या पथकातील जवळपास दीड हजार विद्यार्थी विविध महापुरुषांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. यावेळी शिक्षण मंडळाचे विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष रावसाहेब आवारे, राज्याध्यक्ष के. एस. डोमसे, संमेलनाध्यक्ष बाबूराव जाधव, कार्याध्यक्ष हणमंत साखरे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश देशमुख, संस्थाचालक संघटनेचे कोषाध्यक्ष तथा शोभायात्रेचे संयोजक प्राचार्य डी. एन. केंद्रे, वसंत पाटील, बजरंग चोले, शिवराज म्हेत्रे, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहाय्यक संचालक दत्तात्रय मठपती, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे, मदन धुमाळ, शिवकांत वाडीकर आदींची उपस्थिती होती. राजीव मुंढे यांनी सूत्रसंचालन करून शेवटी उपस्थितांचे आभार मानले.

## महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष शिक्षक नेते श्री. शिवाजीराव साखरे (वाघ) यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ

लातूर: महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष तथा शिक्षकनेते मा.श्री. शिवाजीराव साखरे (वाघ) यांचा सेवापूर्ती निमित्त रविवार दि.१२ जानेवारी २०२५ रोजी रविवारी विविध मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की ३७ वर्षापासून शिक्षक म्हणून कार्य करत असलेले, विविध शिक्षक संघटनेत तालुकाध्यक्ष पदापासून राज्याध्यक्ष पदापर्यंत कार्य करून शिक्षक, मुख्याध्यापक व प्रभारी केंद्रप्रमुख पदावरून ३१ डिसेंबर २०२४ रोजी सेवापूर्ती केलेले शिक्षकनेते मा.शिवाजीराव साखरे (वाघ) यांचा सत्कार समारंभ दयानंद महाविद्यालयांच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर येथील जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे असणार असून प्रमुख मान्यवर राज्याचे सहकार मंत्री मा.बाबासाहेब पाटील व माजीमंत्री मा.दिलीपराव देशमुख यांच्या शुभहस्ते शिवाजीराव साखरे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी व व्याख्याते म्हणून माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर माजी शिक्षण संचालक,गोविंद नांदेडे ,प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, माजी मंत्री अमित देशमुख, संभाजी पाटील निलंगेकर, संजय बनसोडे, लातूरचे खासदार शिवाजीराव काळगे, शिक्षक आमदार विक्रम काळे, आमदार अभिमन्यू पवार, रमेश कराड तसेच लातूरचे शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के माजी जि.प.अध्यक्ष पंडितराव धुमाळ,प्रसिद्ध साहित्यिक भारत सातपुते, माजी शिक्षणाधिकारी व्यंकटराव नेटके, माजी शिक्षणाधिकारी पोपटराव काळे, भंडाऱ्याचे शिक्षणाधिकारी रवींद्र सोनटक्के, लातूरचे शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, इत्यादी उपस्थित राहणार असून याच प्रसंगी माननीय शिवाजीराव साखरे वाघ यांच्या जीवन कार्यावरील महाराष्ट्र शिक्षक हृदयसम्राट या

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE